मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २२९ ■ गुरुवार, ३० एप्रिल २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# राज्यात ३०० कोटी वृक्ष लागवड

## नियोजन व अंमलबजावणीसाठी हरित महाराष्ट्र आयोग

**मुंबई :** राज्यात तीनशे कोटींची वृक्ष लागवडीचे लक्ष्य गाठण्यासाठी हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्याने २०४७ पर्यंत तीनशे कोटी झाड़े लावण्याचे उद्दीष्ट्य ठेवले असून, त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आयोगावर सोपविण्यात आली आहे. आयोगाच्या नियामक मंडळाच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री असतील, तर उपमुख्यमंत्री उपाध्यक्ष, वन मंत्री, पर्यावरण व हवामान बदल मंत्री, कृषी मंत्री आणि रोजगार हमी योजना मंत्री सहउपाध्यक्ष असतील.



राष्ट्रीय वनधोरण १९८८ अनुसार देशाच्या एकूण भौगोलिकक्षएत्रापैकी ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादीत किंवा वृक्षाच्छादित असणे अपेक्षित आहेत. राज्यात वनाच्छादित आणि वृक्षाच्छादित क्षेत्र अनुक्रमे १६.५३ व ४.७२ टक्के आहे. त्यामुळे एकूण क्षेत्र २१.२५ टक्के होत असून ते ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्यासाठी राज्याने दीर्घ नियोजन केले आहे.

राज्याला हे उद्दीष्ट २०४७ पर्यंत साध्य करायचे आहे. त्यासाठी ३०० कोटी वृक्षारोपण मोहीमेचे नियोजन, अंमलबजावणी, सनियंत्रण आणि वित्त पुरवठ्यासाठी हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. वृक्ष लागवडीसाठी जागेची उपलब्धता आणि लँड बँक निर्मितीवर भर दिला जाईल. सध्या २९ हजार चौरस किलोमीटर जमीन उपलब्ध आहे. तीनशे कोटी वृक्ष लागवडीसाठी सुमारे २७ लाख हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे.

राज्यातील वनाच्छादित, वृक्षाच्छादित तसेच गवताळ प्रदेशांचा गुणात्मक व परिणात्मक विस्तार साध्य करणे, हवामान बदलास प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करणे, जलसंधारण सुधारणे, जमीनीचा पोत सुधारणे, जैवविविधतेचे संरक्षण करणे, स्थानिकस्तरावर रोजगार निर्मितीस चालना देणे तसेच स्थानिक नैसर्गीक परिसंस्थांचे जतन क्षेत्रनिहाय पर्यावरणपुरक दृष्टीकोनातून वृक्षलागवड करणे यावर आयोगाच्या माध्यमातून भर दिला जाणार आहे. जिल्हानिहाय लँड बँक विकसित केल्या जाणार आहेत. त्यामध्ये वन विभाग, मनरेगा व अन्य विभागांशी समन्वय साधून जमीन उपलब्ध करून घेतली जाणार आहे.

यामुळे सद्या विविध विभागांमार्फत सुरू असलेले वृक्षारोपण कार्यक्रम आणि अभियानांचे एकात्मिक पद्धतीने अंमलबजावणी करणे शक्य होणार आहे. यासाठी उपलब्ध जमीन, निधी आणि संसाधने केला जाणार आहे.

# जनगणनेच्या पार्श्वभूमीवर पनवेल तहसील कार्यालयामार्फत व्यापक तयारी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : भारत सरकारच्या आगामी जनगणना 2027 या राष्ट्रीय उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर पनवेल तहसील कार्यालयामार्फत व्यापक तयारी सुरू करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी रायगड माननीय किशन जावळे (भारतीय प्रशासकीय सेवा), उपविभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक, तहसीलदार पनवेल मीनल भोसले भामरे तसेच अप्पर तहसीलदार जितेंद्र इंगळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना 2027 साठी नियोजनबद्ध कार्यवाही सुरू असून, सुमारे 1800 प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण पार पाडण्यात येत आहे. या अनुषंगाने प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण 23 एप्रिल 2026 ते 8 मे 2026 या कालावधीत सिकेटी ज्युनिअर कॉलेज, नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आले आहे. पनवेल शहराची सुमारे 7 लाख 29 हजार इतकी मोठी लोकसंख्या लक्षात घेता, जनगणनेचे कार्य प्रभावीपणे पार पाडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली आहे.



या प्रशिक्षणामध्ये विविध शाळांतील शिक्षक तसेच शासकीय कर्मचाऱ्यांचा समावेश असून, त्यांना सकाळी 9 ते सायंकाळी 5 या वेळेत सखोल प्रशिक्षण दिले जात आहे. प्रशिक्षणाच्या पहिल्या दोन दिवसांत जनगणनेची सैद्धांतिक माहिती देण्यात येते, तर तिसऱ्या दिवशी क्षेत्रीय (फिल्ड) प्रशिक्षण दिले जाते. तसेच नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी 1 मे 2026 ते 15 मे 2026 या कालावधीत स्वगणना बाबत जागरूकता निर्माण करण्यात आली आहे. यानंतर 16 मे ते 14 जून या कालावधीत घरगुती गणना हा जनगणनेचा पहिला टप्पा पूर्ण करण्यात येणार आहे. पनवेल तहसील कार्यालयामार्फत या राष्ट्रीय कर्तव्यासाठी योग्य नियोजन, समन्वय व प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे दिसून येत असून, संपूर्ण यंत्रणा तत्परतेने कार्यरत आहे.

# एचपीव्ही लसीकरणास गती देण्याच्या दृष्टीने विविध उपाय योजना राबवाव्यात : आयुक्त मंगेश चितळे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, पनवेल महानगरपालिकेच्या वतीने 14 ते 15 वर्ष वयोगटातील मुलींना एचपीव्ही लसीकरण करणे अनिवार्य असून या लसीकरणास 8 मार्चपासून सुरुवात झाली आहे. या लसीकरण मोहिमेची आढावा बैठक आज मुख्यालयात आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी आयुक्तांनी या लसीकरण मोहिमेस पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात गती देण्याच्या दृष्टीने विविध उपाय योजना महापालिकेच्यावतीने राबविल्या जाव्यात अशा सूचना उपस्थितांना दिल्या.

यावेळी मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी ,शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. गणेश नायर, डॉ. उषा राठोड, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.पाटोदकर, श्री सत्यसाई संजिवनी रूग्णालयाचे डॉ. ऋषीकेश वडके, आशा सेविका उपस्थित होते मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 28 फेब्रुवारी 2026 रोजी एचपीव्ही



लसीकरण मोहिमेचा राष्ट्रीय शुभारंभ करण्यात आला आहे. याअनुषंगाने, मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला आहे.पुढील महिन्याच्या कालावधीत 14 वर्ष पूर्ण होणाऱ्या मुली एचपीव्ही लसीकरण मोहिमेत लसीकरणास पात्र राहतील. हे लसीकरण पूर्णत: मोफत असणार आहे.

त्यानुसार पनवेल महानगरपालिकेच्या वतीने 14 ते 15 वर्ष वयोगटातील मुलींना एचपीव्ही लसीकरणास महापालिका कार्यक्षेत्रात सुरुवात झाली आहे. महापालिका क्षेत्रातील एकुण ७ हजार ७७९ मुलींचे लसीकरण या मोहिमेमध्ये अपेक्षित आहेत.

या लसीकरणामुळे महिलांमध्ये संभाव्य गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग होण्याचे प्रमाण कमी होणार आहे,त्यामुळे नागरिकांनी कोणतेही पूर्वग्रह न ठेवता नमुद वयोगटातील मुलींचे एचपीव्ही लसीकरण करून घ्यावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. महापालिकेच्या 15 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रावरती सकाळी 9.00 ते दुपारी 2.00 यावेळेत केले जात आहे.


# संगमनेरनंतर श्रीरामपूर हादरले !

## ‘उपचारां’च्या आड भोंदूबाबाचा विकृत खेळ उघड!

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : संगमनेर येथील धक्कादायक प्रकारानंतर आता श्रीरामपूरमध्येही भोंदूगिरीच्या नावाखाली महिलांवर अत्याचार केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. पोटदुखीवर उपचार करण्याच्या बहाण्याने एका महिलेची फसवणूक करून तिचे लैंगिक शोषण करणाऱ्या भोंदूबाबाचा अखेर पर्दाफाश झाला आहे.

बेलापूर परिसरातील खटकाळी येथील गणेश माधवराव शिंदे उर्फ गणेश महाराज या आरोपीने सन २०२३ पासून संबंधित पीडित महिलेला आपल्या जाळ्यात ओढल्याचे उघड झाले आहे. पोटातील अल्सर बरा



करण्याचे आमिष दाखवत त्याने सुरुवातीला लिंबू, उदी यांसारख्या तथाकथित धार्मिक उपायांनी महिलेचा विश्वास जिंकला. हळूहळू या विश्वासाचा गैरफायदा घेत आरोपीने तिला गुंगीचे पदार्थ देऊन वारंवार अत्याचार केले.

महिलेच्या आजाराची भीती आणि समाजात बदनामी होईल या धाकाने आरोपीने तिला सतत आपल्या आश्रमात बोलावून घेतले. इतकेच नव्हे, तर जादूटोणा व उपचारांच्या नावाखाली त्याने महिलेची तब्बल १८ ते २० लाख रुपयांची रोकड व सोन्याची फसवणूक केली असल्याचेही समोर आले आहे.

ऑगस्ट २०२५ आणि जानेवारी २०२६ मध्येही धमकावून अत्याचार केल्यानंतर अखेर पीडित महिलेने धैर्य दाखवत श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले असून प्राथमिक चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे.सदर प्रकरणात आरोपीवर बलात्कार तसेच जादूटोणा प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस सखोल तपास करत आहेत. या घटनेमुळे परिसरात प्रचंड संताप व्यक्त होत असून अशा भोंदूगिरीवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.





# दैनिक युवक आधारच्या बातमीचा दणका – प्रशासन जागे

## सणसर शाळेच्या भिंतीचे काम सुरु

**दैनिक युवक आधार**

**सणसर /विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संरक्षक भिंतीचे काम ठेकेदारांनी मागील पंधरा दिवसांपासून खड्डे खणून थांबवले होते. यामुळे शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच ओपन जिममध्ये व्यायामासाठी येणाऱ्या जेष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत दैनिक युवक आधार मध्ये दि.25 एप्रिल रोजी बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर ठेकेदार आणि पंचायत समितीचे अधिकारी तातडीने




Page 3
25 Apr 2026
दैनिक युवक आधार
Epaper.YuvakAadhar.in
संपादक : श्री. संतोष शिवदास आमले

**सणसर प्राथमिक शाळेच्या मैदानातील खड्डे विद्यार्थ्यांच्या जीवावर बेतण्याची शक्यता**

**ठेकेदाराच्या निष्काळजी पणाविरोधात पालकांचा संताप"**

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सणसर येथील मैदानात मागील पंधरा दिवसांपासून संरक्षक भिंतीचे काम करण्यासाठी शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ कॉलम उभे करण्यासाठी मोठे खड्डे खणून ठेवले आहेत.या खड्ड्यांमुळे शाळेत येणाऱ्या लहान विद्यार्थ्यांना रोज मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे खोदून ठेवलेल्या खड्ड्यांमुळे विद्यार्थ्यांचा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शाळेत जाण्या-येण्याच्या मार्गावर अडथळा निर्माण झाल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.गावातील जेष्ठ नागरिक व महिला ओपन जिममध्ये व्यायाम करण्यासाठी जाताना या खड्ड्यांमुळे मोठी कसरत करावी लागत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. शाळेच्या परिसरात सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून,लहान मुलांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

ग्रामपंचायतीने संबंधित ठेकेदारांना योग्य सूचना करून तातडीने काम सुरू करावे,अन्यथा हे खड्डे बुजवून जैसे थे स्थिती करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना रोज त्रास सहन करावा लागत आहे.यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली असून,प्रशासन आणि ठेकेदाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

जागे झाले ग्रामपंचायत प्रशासन यांनी सुद्धा ठेकेदारास वेळेत काम पूर्ण करण्यासाठी सूचना करण्यात आले असल्याची माहिती सांगण्यात आली. तसेच ठेकेदारांने काम पुन्हा सुरु करून ग्रामस्थांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला असला तरी पण भिंतीचे काम निविदाप्रमाणे करण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थांनी ग्रामपंचायतकडे केली आहे. भिंतीचे काम सुरु झाल्यामुळे ग्रामस्थांनी दैनिक युवक आधारचे आभार मानले. पत्रकारितेच्या प्रभावामुळे प्रशासन हलले आणि नागरिकांच्या अडचणी दूर करण्यासाठी पावले उचलली गेली असल्याची भावना यावेळी नागरिकांनी बोलून दाखवली.

# उत्कृष्ट सामाजिक कार्याचा सन्मान; ‘बाप कविता आधारवडाच्या’ काव्यसंग्रहाची भेट

**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर (प्रतिनिधी)अरविंद पांचाळ** : समाजहिताची जाणीव जपत निःस्वार्थ भावनेने सामाजिक कार्य करणारे, तसेच सामाजिक बांधिलकीची जपणूक करणारे माननीय पत्रकार श्री. संजय दत्तरामजी पाटील इंगोले (मालेगावकर), सचिव – अखिल भारतीय मराठी पत्रकार संघ, तालुका अर्धापूर यांचा मालेगाव येथे अत्यंत सन्मानपूर्वक गौरव करण्यात आला. हा सन्मान प्रा. विशाल वाघमारे यांच्या हस्ते पार पडला.

या प्रसंगी प्रा. विशाल वाघमारे यांनी कवी चंद्रकांत भोपाळकर यांच्या लेखणीतून साकारलेल्या ‘बाप’ या अत्यंत संवेदनशील आणि हृदयस्पर्शी विषयावर आधारित ‘बाप कविता आधारवडाच्या’ या १०० कवितांच्या काव्यसंग्रहाची भेट देत श्री. पाटील यांच्या कार्याला साहित्यिक अभिवादन केले. या काव्यसंग्रहातून ‘बाप’ या नात्याची माया, त्याग, कष्ट आणि न बोलता व्यक्त होणारी भावना अत्यंत प्रभावीपणे उभी राहते.

या छोटेखानी पण आशयघन कार्यक्रमाला प्रा. सुदर्शन फाजगे यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. उपस्थित मान्यवरांनी श्री. पाटील यांच्या निर्भीड, समाजाभिमुख आणि मूल्यनिष्ठ पत्रकारितेचे कौतुक करत त्यांच्या कार्याला प्रेरणादायी असे संबोधले.




पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडत, सकारात्मक बदल घडविण्याचा ध्यास घेतलेल्या श्री. पाटील यांच्या कार्याचा हा सन्मान म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाला मिळालेली योग्य दाद होय.

यावेळी बोलताना श्री. संजय पाटील यांनी ‘बाप’ या नात्याच्या भावविश्वाचे साहित्यिक चित्रण समाजमनाला स्पर्श करणारे असून, नव्या पिढीसाठी ते नक्कीच प्रेरणादायी ठरेल, असे मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाने साहित्य, शिक्षण आणि पत्रकारिता या तिन्ही क्षेत्रांचा सुंदर संगम घडवून आणत उपस्थितांच्या मनावर कायमस्वरूपी ठसा उमटवला.

# एप्रिल महिन्यातच बाळगंगा नदी मोजते शेवटची घटका?

## डोणवत धरणाचे पाणी नक्की कोणासाठी? पाटबंधारे विभाग या कडे लक्ष देतील का?

**दै.युवक आधार**

**खालापूर तालुका - संतोष शेवाळे** : गेली अनेक वर्ष वर्षभर पाण्याने तुडुंब भरून वाहणारी बाळ गंगा नदीचे पाणी खूप कमी झाल्याने या नदीच्या पाण्यावर अवलंबून असणारे शेतकरीवर्ग चर्चा करू लागले की पाणी नक्की कोणासाठी ? तस पाहता डोणवत येथे उगम स्थान असलेल्या या बाळगंगेला लागलेली उतरती कळा याच मुख कारण आहे ते म्हणजे कारखान्याला लागणाऱ्या पाण्यासाठी पाण्याचा उपसा रात्रंदिवस टँकरद्वारे होणारे पाण्याची वाहतूक नक्की हा धरण बांधला कोणासाठी? हा प्रश्न सध्या इथल्या स्थानिकांना पडला आहे.याच बालगंगेच्या पात्रातून अनेक गावांना पाणीपुरवठा केला जात असतो संभाव्य अशा प्रकारे नदीपात्रातून टँकरद्वारे कंपन्यांना पाणीपुरवठा केला जात असल्याने स्थानिकांमध्ये एक भीतीच वातावरण निर्माण झाला आहे याच नदीच्या पाण्यातून अनेक



ठिकाणी भात शेतीची केली जात होती अनेक ठिकाणी भाजीपाल्याचे मळे लावले जात होते आज पाण्याविना या धंद्यावर उपासमारीची वेळ आली आहे भविष्यामध्ये जर अशा प्रकारे नदीपात्रातलं पाणी टँकरद्वारे जर विकलं गेलं तर शेतकरी राजा पुढे मोठ्या संकट निर्माण झाल्या शिवाय राहणार नाही या बाळगंगेच्या पात्रातून अनेक व्यवसायिक शेतकरी आपला उदरनिर्वाह करताना पाहावयास मिळाला आहे आज गती या नदीपात्रातून उपसा केलेल्या पाण्याचा कारखाना फायदा होत आहे भविष्यात या भागात बाळगंगेच्या पाण्यावर शेती करणारे शेतकरी नामशेष होण्याच्या मार्गावर दिसत आहेत तरी प्रशासनानी या नदी पात्रातील होणारा पाण्याचा उपसा ताबडतोब बंद करावा अन्यथा या ठिकाणी मोठे जल आंदोलन निर्माण होण्याची शकता नाकारता येत नाही याच बाबतीत खबरदारी घ्यावी पाटबंधारे विभागाने ज्या कोणाला पाणी उपसाच्या परवानगी दिल्या असतील त्या ताबडतोब बंद कराव्यात जेणेकरून या नदी पात्राच्या पाण्यावर अवलंबून असणारे गुरेढोरे जनजनावर याच्यावर उपास मारीची वेळ येऊ नये पुढचा मे महिन्यात करता पाण्याचा साठा सुरळीत सुरू राहील याची खबरदारी घ्यावी नदीपात्रातून टँकरद्वारे उचलल्या जाणाऱ्या टँकर धारकांना कायमचं पाणी बंद करावा तसेच या भागातील शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी प्रशासनने खबरदारी घ्यावी.

याबाबत ग्रामपंचायत शिरवली ग्रामपंचायत सरपंच गोठरण बु. ग्रामपंचायत सरपंच जांभिवली सरपंच यांनी संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार केला असून लवकर यावरती कारवाई होईल असं म्हटलं जात आहे संबंधित पत्राचे पोच पंचायत समिती खालापूर,तहसील कार्यालय खालापूर, पोलीस निरीक्षक खालापूर यांच्याकडे पाठवण्यात आले आहेत संबंधित टँकर वरती कधी कारवाई केली जाते याचीच लोक वाट पाहत आहेत

# कळंबोलीत माथेफीरूकडून हॉटेल जाळण्याचा प्रयत्न, सीसीटिव्हीमुळे गुन्हा उघडकीस

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : कळंबोलीतील द्वारका हॉटेलमध्ये एका माथेफिरू तरुणाने पेट्रोल टाकून आग लावण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना सीसीटीव्ही कॅमेरामुळे उघडकीस आली आहे. बाटलीभर पेट्रोल हॉटेलच्या शेटर हॉटेलच्या आतमध्ये टाकून हॉटेलमध्ये आग लावण्याच्या प्रयत्न केला. आगीचा मोठा भडका झाला. मात्र सुदैवाने आग हॉटेलमध्ये पसरली नाही. परंतू या दरम्यान धूराचे लोट हॉटेलच्या आत पसरले. सीसीटीव्हीत धूराचे लोट पाहून कर्मचा-यांनी तातडीने विज जोडणी बंद केली. यामुळे अनर्थ टळला. या दरम्यान रात्रगस्त घालणारे पोलीसही तेथे पोहचले. संबंधित आरोपीला अटक करण्यात आली आहे.

कळंबोली पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या माहितीनुसार, ही घटना 26 एप्रिल 2026 रोजी पहाटे सुमारे 2.41 वाजण्याच्या सुमारास सेक्टर-5 येथील महावीर प्लाझा या इमारतीमधील ‘द्वारका हॉटेल अँड रेस्टॉरंट बार’ येथे घडली. या प्रकरणी 50 वर्षीय हॉटेल मालक रवीश शेट्टी यांनी तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी या प्रकरणी 35 वर्षीय ऋतिक रविंद्र पगारे याला ताब्यात घेतले. ऋतिक हा सेक्टर 5 येथील शिवसागर सोसायटीत राहतो. त्याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता 2023 मधील कलम 326 (ह) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री हॉटेलमध्ये दोन ग्राहकांमध्ये झालेल्या वादात हॉटेलमालक शेट्टी यांनी मध्यस्थी करून ही भांडणे सोडवली होती. याचा राग ऋतिक पगारे याला आता होता. याच रागातून संतापलेल्या ऋतिकने हॉटेलच्या शटरवर बाटलीतील पेट्रोल ओतून आग लावण्याचा प्रयत्न केला. ही संपुर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली. या घटनेमुळे हॉटेल ज्या इमारतीत आहे त्या संपूर्ण इमारतीलाही धोका निर्माण होऊ शकला असता.

दरम्यान, हॉटेलमधील सीसीटीव्ही फुटेजमध्ये धूर दिसताच कामगारांना प्रकार लक्षात आला. त्यांनी तातडीने विजेची उपकरणे सुरू असल्याने विज जोडणीच बंद केली. तत्काळ कळंबोली पोलिसांना माहिती देण्यात आली. विशेष म्हणजे पोलिसांचा प्रतिसाद वेळ केवळ एका मिनिटाचा नोंदवला गेला. रात्री गस्त घालणाऱ्या पोलिसांनी स्वतःजवळील पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांमधील पाणी वापरून आगीचा शेवटचा विस्तव विझवला.

या प्रकरणात वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी लागलीच शोध मोहीम राबवून संशयीत आरोपी ऋतिक पगारे याला ताब्यात घेऊन त्याच्यावर कायदेशीर कारवाई सुरू केली. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय डफळ हे करीत आहे. ऋतिकने पेट्रोल कुठून आणले. याचा शोध पोलीस घेत आहेत. हॉटेल कर्मचारी आणि पोलिसांच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळल्याने परिसरात समाधान व्यक्त होत आहे.

# श्रीवर्धनची राजकीय शोकांतिका: पैशाच्या राजकारणात हरवलेलं मतदारांचं स्वातंत्र्य

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित** : लोकशाहीचा कणा असलेलं मतदान आणि आज श्रीवर्धनमध्ये एका वेगळ्याच वळणावर उभं असल्याचं चित्र समोर येत आहे. सध्याच्या राजकीय परिस्थितीकडे पाहिलं असता, विचार, विकास आणि कामगिरी यापेक्षा पैशाचं वर्चस्व अधिक प्रभावी ठरत असल्याची खंत स्थानिक स्तरावर व्यक्त केली जात आहे.

निवडणुकीच्या काळात मतदारांना विविध मार्गांनी आर्थिक आमिष दाखवलं जात असून, अनेक नागरिक या प्रलोभनाला बळी पडताना दिसत आहेत. परिणामी, स्वतःच्या मताचा अधिकार विकून टाकल्यासारखी स्थिती निर्माण होत आहे. मतदानानंतर मात्र हेच नागरिक निवडून आलेल्या प्रतिनिधीकडे केवळ प्रेक्षकाच्या भूमिकेत पाहताना दिसतात.

यामुळे प्रामाणिकपणे काम करण्याची इच्छा असलेल्या, पण आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या उमेदवारांना संधी मिळणं कठीण होत चाललं आहे. पैशाच्या जोरावर निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य मिळत असल्याने लोकशाहीच्या मूळ तत्त्वांवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

ही परिस्थिती केवळ राजकारणापुरती मर्यादित नसून, समाजाच्या नैतिक मूल्यांवरही परिणाम करणारी ठरत आहे. मतदारांनी आपल्या मताचं महत्त्व ओळखून जागरूक भूमिका घेतली, तरच या पैशाच्या राजकारणाला आळा बसू शकतो, अन्यथा ही शोकांतिका आणखी गडद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# सावित्रीची लेक प्रा. सुनिता इथापे यांचा वऱ्हाड विकास तर्फे सन्मान

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी**


**दर्यापूर** : वऱ्हाड विकास व फुले-शाहू-आंबेडकर संघटनांच्या संयुक्त विद्यमाने 'सावित्रीची लेक' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रा. सुनिता राम इथापे यांचा जाहीर सत्कार नुकताच करण्यात आला.

**सत्कार सोहळा**

या कार्यक्रमात प्रा. सुनिता इथापे यांना शाल, श्रीफळ, महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले दांपत्याची प्रतिमा आणि विचारपुष्प प्रदान करून गौरविण्यात आले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा प्रसार आणि समाजप्रबोधनाचे कार्य अविरतपणे केल्याबद्दल त्यांचा हा सन्मान करण्यात आला.

**मान्यवरांची उपस्थिती**

या प्रसंगी समाजभूषण प्रा. श्रीकृष्ण बनसोड, ऋणानुबंध महिला आघाडीच्या



प्रा. डॉ. उज्वला मेहरे, ज्येष्ठ समाजसेविका सौ. सुनंदा बनसोड, यशस्वी उद्योजिका स्मिता घाटोळ, पोलीस पाटील सौ. कविता पाचघरे, महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टच्या विश्वस्त सौ. अरुणा लांडे, प्रशासकीय अधिकारी कीर्ती म्हसकर, सौ. मालती पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. याशिवाय महिला आघाडीच्या सदस्या व प्रा. इथापे यांचा मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

सत्काराला उत्तर देताना प्रा. सुनिता इथापे म्हणाल्या, "राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, माता रमाई यांच्या कार्यापासून प्रत्येक महिलेने प्रेरणा घेण्याची आज गरज आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच पुढील वाटचाल केली पाहिजे.

समाजभूषण प्रा. श्रीकृष्ण बनसोड यांनी प्रा. इथापे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, "प्रा. सौ. सुनीता इथापे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन ते विचार समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत रुजविण्याचे मोलाचे कार्य केले आहे. त्यांचे हे कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे."

कार्यक्रम उत्साहात पार पडला व फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेचा जागर यावेळी करण्यात आला.

# महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब सहाय्यक लेखाधिकारी संघटना ( राजपत्रित) नागपूर यांची नवीन कार्यकारणी गठीत

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर** : महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब सहाय्यक लेखाधिकारी संघटना (राजपत्रित) नागपूर, अंतर्गतअंतर्गत कार्यरत सर्व अधिकारी यांची नागपूर जिल्हा येथील नवीन कार्यकारिणी गठीत करण्याकरिता केंद्रीय संघटनेचे राज्य समन्वयक श्री निलेश बोनगिरवार यांचा प्रमुख उपस्थितीत व विभागीय अध्यक्ष श्री उत्तम गलानी यांचे अध्यक्षतेखाली आज दिनांक 28/4/26 रोजी नागपूर जिल्हा कार्यकारणी ची निवड करण्यात आली. नागपूर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष म्हणून विनोद बोरघाटे, उपाध्यक्ष अमोल देशपांडे, व अमोल परमार्थ, प्रमुख कार्यवाह निलेश सहारे, सहसचिव संजय पोलके, प्रवीण रीनके, कोषाध्यक्ष रुपेश गायधने, सह कोषाध्यक्ष श्रीकांत मेश्राम, प्रसिद्धी प्रमुख प्रज्ञा पाटील, महिला प्रतिनिधी आरती पाटील, मेघा मेश्राम



तर संचालक म्हणून सारंग उज्जैनकर, दीपक टेकाळे व मुकेश हरणे यांची निवड करण्यात आली.

विभागिय अध्यक्ष उत्तम गलानी यांनी संघटनेचे महत्व, संघटनेची कार्यपध्दती याबाबत नवनिर्वाचित पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब सहाय्यक लेखाधिकारी संघटना (राजपत्रित) केंद्रिय संघटनेचे समन्वयक निलेश बोनगिरवार यांनी संघटनेच्या सध्या चालू असलेल्या घडामोडी बाबत विस्तृत माहिती उपस्थीत संघटनेच्या सभासदांना देण्यात आली. सदर सभेस मंगेश चरडे, विजय गाटे, संजय बुलबुले, राजेश बेलोरकर, सचिन बैस, स्वाती भेडे, मानसी बिसने, सुशील जकुलवार, रेणुका काटकर इत्यादी संघटनेचे सभासद उपस्थीत होते.

# दर्यापूर तहसीलमध्ये वाळू व्यावसायिकाचा आत्मदहनाचा प्रयत्न

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर :** दि.२९/एप्रिल तहसीलमधील करतखेड येथील वाळू व्यावसायिक नागेश वावरे यांनी तहसील कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रॉयल्टीवर वाळूची वाहतूक करत असताना ट्रॅक्टर जप्त केल्याने आणि दंडापोटी ६० हजार रुपयांची मागणी केल्याने संतप्त झालेल्या वावरे यांनी अंगावर डिझेल ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र येवदा आणि दर्यापूर पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांच्या समयसूचकतेमुळे मोठा अनर्थ टळला.

**नेमके काय घडले**

नागेश वावरे हे करतखेड येथील रहिवासी असून वाळू व्यवसाय करतात. तहसीलदार डॉ.



रवींद्रकुमार कानडजे आणि महसूल अधिकाऱ्यांनी वावरे यांचा ट्रॅक्टर नदीच्या बाहेर पकडून जप्त केला. वावरे यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्याकडे वाळू वाहतुकीबाबतची सर्व कागदपत्रे होती व ती त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांपुढे पुरावे म्हणून सादरही केली होती. तरीही महसूल अधिकाऱ्यांनी ट्रॅक्टर सोडला नाही.

ट्रॅक्टर सोडण्यासाठी दंडाच्या नावाखाली ६० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचा आरोप वावरे यांनी केला. यामुळे संतप्त होऊन त्यांनी थेट तहसील कार्यालय गाठले आणि अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला.

**पोलिसांची तत्परता**

या घटनेमुळे तहसील कार्यालयाच्या परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रसंगावधान राखत येवदा आणि दर्यापूर पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी वेळीच हस्तक्षेप केला. पोलिसांनी वावरे यांना रोखल्याने मोठी दुर्घटना टळली. पोलिस आणि महसूल अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपानंतर परिस्थिती शांत झाली.

**प्रशासनाचे म्हणणे**

या संदर्भात तहसीलदार डॉ. कानडजे यांनी सांगितले की, नागेश वावरे यापूर्वीही गाढवांच्या माध्यमातून वाळूचा अवैध व्यवसाय करत होते. जेव्हा त्यांचा ट्रॅक्टर पकडला, तेव्हा तो नियमांचे उल्लंघन करत होता. त्यामुळे त्याचा ट्रॅक्टर तहसील कार्यालयात जप्त करून नियमानुसार दंड ठोठावण्यात आला.

**वाळू धोरण आणि वाद**

तालुक्यात महसूल प्रशासनाने वाळू घाटांचे लिलाव केले आहेत आणि वाळू उपशासाठी वेळेचे बंधन घालून दिले आहे. मात्र, काही व्यावसायिक या नियमांचे पालन करत नाहीत. त्यामुळे प्रशासनाला त्यांच्याविरुद्ध कारवाई करावी लागते, असेही तहसीलदारांनी स्पष्ट केले.दरम्यान, करतखेड येथील सरपंचांनीही तहसीलदारांवर गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणामुळे तहसील प्रशासन आणि वाळू व्यावसायिकांमधील तणाव पुन्हा एकदा समोर आला आहे.

# सोन्याच्या दुकानातून दागिन्याची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : सोन्याच्या दुकानातून पन्नास हजार रुपये किमतीच्या दागिन्याची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 27 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. शांतीलाल पटेल यांचा न्यू सावरिया ज्वेलर्स, आकाश हाईट, सेक्टर 10, तळोजा येथे सोन्याचे दुकान आहे. त्यांच्या दुकानात एक अनोळखी इसम आला आणि चांदीच्या पैंजण खरेदी करावयाच्या असे सांगून तीन चांदीचे पैंजणांचे जोड पसंत केले आणि ते बाजूला ठेवून मंगळसूत्राचे पेडल दाखवण्यास सांगितले. त्याला सोन्याच्या दागिन्याचा बॉक्स दाखवला असता त्यावेळी दुकानात आणखी एक गिऱ्हाईक आले आणि ते काउंटरवर गेल्याने त्या बॉक्समधून ५० हजार रुपये किमतीचा सोन्याचा दागिना नकळत अनोळखी इसमाने त्याच्या मोबाईलच्या खाली लपवून चोरी करून घेऊन गेला.

## संक्षिप्त

### हेरॉईन प्रकरणी महिलेला अटक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** हेरॉईन विक्री प्रकरणी कामोठे पोलिसांनी एका महिलेला अटक केली. तीच्या विरोधात 27 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. 26 एप्रिल रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास मानसरोवर रेल्वे स्टेशन रस्ता येथे एक महिला संशयित हेरॉईन अमली पदार्थ विक्री करत असताना सापडून आली. या महिलेने छापा दरम्यान तिचे नाव नितीना निळकंठराव भोसले असे खोटे सांगितले. आरोपी महिलेकडे अधिक चौकशी केले असता तिचे नाव अनिता संजीव पवार (वय 32) असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

### हॉटेलच्या शटरवर पेट्रोल टाकून आग लावून जाळण्याचा प्रयत्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** हॉटेलच्या शटरवर बाटलीतील पेट्रोल टाकून आग लावून जाळण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी ऋतिक रवींद्र पगारे (राहणार सेक्टर पाच कळंबोली) याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात 26 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. द्वारका हॉटेल अँड रेस्टॉरंट बार सेक्टर 5 कळंबोली येथे ग्राहकाशी झालेल्या वादात रवीश शेट्टी यांनी मध्यस्थी केल्याच्या रागातून ऋतिक पगारे याने हॉटेलच्या शटरवर बाटलीतील पेट्रोल टाकून आग लावून जाळण्याचा प्रयत्न केला.

### महिलेची 18 तोळ्याची सोन्याची गंठण चोरणाऱ्या चोराला पकडले

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** हळदी समारंभात बसलेल्या 35 वर्षीय महिलेच्या गळ्यातील 18 तोळे वजनाची सोन्याची गंठण चोरणाऱ्या चोराला नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. त्याच्याकडून 18 तोळे वजनाची सोन्याची गंठण ताब्यात घेण्यात आली. आरोपी रजनीस इंद्रपाल केवट (राहणार वळवली गाव) याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात 27 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. कळंबोली, सेक्टर एक इ येथील सोनम अविनाश पाटील ह्या त्यांचे चुलत दीर चेतन हनुमंत पाटील (राहणार कळंबोली) यांच्या हळदीच्या कार्यक्रमासाठी कुटुंबीयांसह रविवार 26 एप्रिल रोजी कळंबोली येथे गेल्या होत्या. रात्री जेवण झाल्यानंतर सोनम पाटील या मंडपामध्ये कुटुंबियांसोबत बसल्या होत्या. रात्री दहा ते साडेदहाच्या सुमारास आरोपी देखील त्यांच्या पाठीमागील बाजूला बसला होता. रात्री सव्वा दहाच्या सुमारास अचानक मंडपाच्या पाठीमागून येऊन आरोपी रजनीस इंद्रपाल केवट याने सोनम पाटील यांच्या गळ्यातील 18 तोळे वजनाचा सोन्याची गंठण खेचून तो पळून गेला. यावेळी सोनम पाटील घाबरल्या आणि त्यांनी आरडाओरडा केला. आजूबाजूचे हळदी समारंभातील सर्व नागरिक आणि त्यांचे कुटुंबीय जमा झाले आणि काय झाले असे विचारले असता त्यांनी चोराने त्यांची 18 तोळ्याची गंठण पळवली असल्याचे सांगितले. यावेळी चोराचा शोध घेत गावातील सर्व नागरिक, कुटुंबीय चोराच्या पाठीमागे धावत गेले आणि त्याचा पाठलाग केला. यावेळी पळताना चोराला गावाच्या बाहेर निघता आले नाही. आणि तो पुन्हा पळता पळता मंडपात आला. यावेळी आरोपी चोर रजनीस इंद्रपाल केवट याला नागरिकांनी पकडले. त्याला काहींनी चोप देखील दिला.

# ताराबंदर अनधिकृत कांदळवन कत्तलेवर प्रशासन मौन, मच्छीमारांवर मात्र दडपशाहीचा बडगा! वनविभागाचा खोटा चष्मा उघड

## तस्करीसाठी सावधगिरी; डिझेल वाळू धंद्यासाठी जेट्टी? जनता संतप्त

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग रेवदंडा निलेश फुंडे प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील ताराबंदर समुद्रकिनारी अनधिकृत भराव आणि कांदळवनाची मोठ्या प्रमाणात पुरती कत्तल सुरू असताना प्रशासनाने पूर्णपणे मौन धरले आहे. याचवेळी पारंपरिक मच्छीमारांना त्यांच्या बोटी हटवण्याचे आणि 'प्रवेश निषिद्ध' फलक लावण्याचे आदेश देऊन वनविभागाच्या कर्मचाऱ्यांकडून धमकावली सुरू आहे. ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लहर उसळली असून, भूमाफियांच्या जाळ्यात प्रशासन अडकल्याचा आरोप होत आहे.



**ग्रामस्थांचा तीव्र विरोध आणि वनविभागाची टाळाटाळ**

ताराबंदर ग्रामस्थ मंडळाचे सचिव प्रतीक प्रमोद कणगी यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी नितीन ढगे आणि कर्मचारी अभिजीत पाटील यांच्याशी संपर्क साधला. अभिजीत पाटील यांनी मात्र बोटी हटवण्याचे आदेश वरिष्ठांकडून मिळाल्याचे मान्य केले, पण जेसीबी आणि पोकलेन मशिनद्वारे रात्रीच्या आडोशाला केलेल्या अनधिकृत भरावांवर कारवाईबाबत स्पष्ट उत्तर दिले नाही. ग्रामस्थांनी सांगितले, "गट क्रमांक, सीआरझेड (कोस्टल रेग्युलेशन झोन) नियमांची माहिती देण्यासही त्यांनी नकार दिला. हे दुहेरी मापदंड स्पष्टपणे दिसत आहेत."

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, कांदळवनाची कत्तल पर्यावरणाला धोकादायक आहे. हे वन क्षेत्र मच्छीमारांच्या उपजीविकेचा आधार असून, येथील जैवविविधता नष्ट होत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अनेक तक्रारी केल्या असूनही कोणतीही कारवाई झालेली नाही. "रात्री भराव चालू असताना वनविभागाचे कर्मचारी मच्छीमारांना धमकावतात, पण खऱ्या गुन्हेगारांना सोडून देतात," असे ग्रामस्थांचे मत आहे.

**भूमाफियांचा जाळा आणि तस्करीचा संशय**

जनतेच्या चर्चेनुसार, राजकीय पुढाऱ्यांचा आणि श्रीमंत धनदांडग्यांचा मेळ घातला असून, येथे जेट्टी बांधण्याचा घाट घालण्यात आला आहे. या जेट्टीमधून डिझेल, वाळू आणि गावठी दारू यांची तस्करी होणार असल्याचा संशय ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. "हे अनधिकृत कामे भूमाफियांच्या फायद्यासाठी सुरू आहेत. मच्छीमारांच्या पिढ्यानपिढ्या चाललेल्या समुद्री उपजीविकेवर हा थेट हल्ला आहे," असे स्थानिक मच्छीमार नेते म्हणाले.

ताराबंदर परिसर हा पारंपरिक मासेमारीचा केंद्रबिंदू आहे. येथील ५० हून अधिक कुटुंबे केवळ मासेमारीवर अवलंबून आहेत. अनधिकृत भरावांमुळे समुद्रकिनारा अरुंद होत असून, मासे पकडण्याची जागा कमी होत आहे. ग्रामस्थांनी सांगितले की, हे कामे कायद्याने बंद असले तरी पैशाच्या जोरावर सुरू आहेत.

**प्रतीक कणगींची ठणकावून इशारा; केंद्र-राज्य सरकारकडे अपेक्षा**

प्रतीक कणगी यांनी स्पष्टपणे सांगितले, "लेखी आदेशाशिवाय मच्छीमारांचे हक्क हिरावले तर आम्ही उच्च अधिकाऱ्यांपर्यंत, जिल्हाधिकारी, वन विभागाचे मुख्य वनसंरक्षक आणि पर्यावरण मंत्रालयापर्यंत प्रकरण घेऊन जाणार. ग्रामस्थ मंडळाने केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारकडे भूमाफियांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे."ग्रामस्थ मंडळाने आता केंद्र आणि राज्य विभागांकडे तक्रार दाखल करण्याची तयारी केली असून, अनधिकृत धंद्यांवर आळा घालण्यासाठी आंदोलनाची हाक दिली आहे. मच्छीमार हक्क अबाधित ठेवण्यासाठी लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. प्रशासनाने तात्काळ कारवाई करून कांदळवन संरक्षण आणि मच्छीमारांच्या हक्कांचे रक्षण करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# नवीमुंबई पोलीस हवालदार सचिन गोसावी आणि बाबा मनोहर भोसले यांची भेट ही केवळ एका बापाची आपल्या मुलाचा जीव वाचवण्यासाठीची तळमळ

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पोलीस हवालदार सचिन गोसावी यांचे नाव बाबा मनोहर भोसले यांच्याशी जोडून काही मीडियातील समाजबांधव जनतेची केवळ दिशाभूल व फसवणूक करत असून खरी परिस्थिती अत्यंत गंभीर व दुःखदायक आहे. नवी मुंबई पोलीस हवालदार सचिन गोसावी आणि बाबा मनोहर भोसले यांची भेट ही केवळ एका बापाची आपल्या मुलाचा जीव वाचवण्यासाठीची तळमळ होती.

सत्य परिस्थिती अशी आहे की सचिन गोसावी यांनी स्वतःचा लिव्हर हा आपल्या मुलास् देऊन त्यास जीवदान दिले आहे, एका बापाने आपल्या मुलाचा जीव वाचवा म्हणून केलेली ही धडपड असून यामागे त्यांची एकच तळमळ होती की माझा मुलगा लवकर या आजारातून बरा व्हावा, लिव्हर ट्रान्सप्लांट करून देखील मुलाची तब्येत सुधारत नव्हती अशावेळी त्यांच्या जवळच्या व्यक्तीने सचिन गोसावी यास सांगितले तुम्ही तुमच्या मुलास बाबा मनोहर भोसले यांना दाखवा नक्की फरक पडेल , अशावेळी एका बापाने आपला मुलगा लवकर बरा होईल या आशेने संपूर्ण परिवारासह बाबा मनोहर भोसले यांची भेट घेतली व त्यावेळी काढलेला हा फोटो असून काही समाजकंटकांनी हा फोटो मीडिया द्वारे लोकांपर्यंत पोहोचवून एक चुकीची बातमी व लोकांमध्ये एक खोटा संभ्रम निर्माण करण्याचा खोटा प्रयत्न केला असून यांच्या विरोधात सचिन गोसावी हे कायदेशीर कारवाई करणार असून लवकरच वकीला मार्फत लीगल नोटीस देखील यांना देण्यात येणार असल्याचे सचिन गोसावी यांनी सांगितले.



तसेच या प्रकरणात कोणत्याही वरिष्ठ अधिकारी, सचिन गोसावी, बाबा मनोहर भोसले यांच्यासोबत एकत्रितपणे एकही फोटो उपलब्ध नसून तरीदेखील चुकीच्या पद्धतीने बातम्या पसरवण्याचे काम सध्या महाराष्ट्र राज्यात जोरात सुरू आहे अशा लोकांवरती लवकरच कायदेशीर कारवाई करणार असल्याचे सचिन गोसावी यांनी यावेळी सांगितले.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व महसूल समाधान शिबिरांतर्गत देवणीत 1000 विद्यार्थ्यांना मोफत प्रमाणपत्रांचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम :** देवणी शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने राबविण्यात येणाऱ्या महसूल समाधान शिबिरांतर्गत देवणी मंडळ विभागात विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे. दिनांक 8 मे 2026 रोजी देवणी मंडळ कार्यक्षेत्रातील शाळांमधील इयत्ता नववी, दहावी व अकरावीमध्ये प्रवेश घेणाऱ्या (शैक्षणिक वर्ष 2026-27) विद्यार्थ्यांना उत्पन्न व रहिवासी प्रमाणपत्रांचे निशुल्क वाटप करण्यात येणार आहे.




या उपक्रमाअंतर्गत 1000 विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरणाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, हा कार्यक्रम विवेक वर्धनी विद्यालय, देवणी येथे पार पडणार असून. या प्रमाणपत्रांचे वितरण तहसीलदार वाडकर, मंडळ अधिकारी जाधव तसेच ग्राम महसूल अधिकारी देवणी तलाठी कांबळे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी देवणी मंडळ विभागातील सर्व विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महसूल विभागाकडून करण्यात आले आहे. जनजागृतीसाठी ग्रामसभा, दवंडी, सूचना फलक, व्हॉट्सअॅप गट व सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यापक प्रसिद्धी देण्यात येत असून विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड, बोनाफाईड प्रमाणपत्र व फोटो संबंधित शाळेमध्ये सादर करावेत, असेही सांगण्यात आले आहे. लोकाभिमुख, पारदर्शक व कार्यक्षम प्रशासनाच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज महसूल महाराजस्व अभियान राबविण्यात येत असून, या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे खाजगी विद्यापीठांमध्ये रूपांतर : बदलत्या शिक्षण व्यवस्थेचे चित्र

महाराष्ट्र शासनाने २८ एप्रिल २०२६ रोजी घेतलेला निर्णय हा राज्याच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून पाहिला जात आहे. अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे खाजगी विद्यापीठांमध्ये रूपांतर करण्यासाठी समिती गठीत करण्याचा हा निर्णय केवळ प्रशासकीय स्वरूपाचा नसून, शिक्षण व्यवस्थेच्या भविष्यासंदर्भात व्यापक बदलांची नांदी ठरणारा आहे. या निर्णयामुळे शिक्षणाच्या स्वरूपात, उद्दिष्टांत आणि कार्यपद्धतीत दीर्घकालीन परिणाम घडण्याची शक्यता आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात शिक्षण क्षेत्रात स्पर्धा, गुणवत्ता, संशोधन आणि नवोन्मेष यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जागतिक पातळीवर शैक्षणिक संस्थांची रँकिंग, संशोधनाची गुणवत्ता आणि उद्योगसहभाग या बाबींना प्राधान्य दिले जात आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण संस्थांना अधिक स्वायत्तता देण्याची आवश्यकता शासन अधोरेखित करते. तेव्हा शासनाचा असा विश्वास आहे की, स्वायत्तता मिळाल्यास संस्थांना त्यांच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि आर्थिक बाबींमध्ये अधिक प्रभावीपणे निर्णय घेता येतील आणि त्या जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकतील.

तथापि, स्वायत्ततेचा हा मुद्दा एकांगी न पाहता सर्वांगीण दृष्टिकोनातून समजून घेणे आवश्यक आहे. स्वायत्तता म्हणजे केवळ अधिकार नव्हे, तर जबाबदारीही आहे. शिक्षण संस्थांना शुल्क निश्चित करण्याचे स्वातंत्र्य, अभ्यासक्रम रचनेवरील नियंत्रण आणि कर्मचारी भरतीतील स्वायत्तता दिल्यास त्या अधिक लवचिक आणि कार्यक्षम होऊ शकतात. मात्र, या अधिकारांचा योग्य वापर झाला नाही, तर त्यातून असमतोल निर्माण होऊ शकतो. शिक्षण क्षेत्रात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांचे जतन होणे तितकेच आवश्यक आहे.

सध्याच्या काळात काही खाजगी विद्यापीठांच्या कार्यपद्धतीकडे पाहिल्यास, उच्च शुल्क आकारणी, मर्यादित पारदर्शकता आणि संस्थेच्या 'ब्रँड' निर्मितीवर दिला जाणारा भर दिसून येतो. अशा परिस्थितीत अनुदानित महाविद्यालयेही त्याच दिशेने वळली, तर शिक्षणाच्या मूळ उद्दिष्टांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून समाजघटकांना सक्षम बनविण्याचे माध्यम आहे. त्यामुळे शिक्षणाचा व्यापारीकरणाकडे झुकणारा कल समाजातील विषमता वाढवू शकतो.

अनुदानित महाविद्यालयांनी विशेषतः ग्रामीण आणि वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. कमी शुल्क, आरक्षण धोरण आणि स्थानिक पातळीवरील उपलब्धता यामुळे अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळाली. परंतु या संस्थांचे खाजगी विद्यापीठांमध्ये रूपांतर झाल्यास शुल्कवाढ, प्रवेशातील स्पर्धा आणि आर्थिक अडचणी या कारणांमुळे काही विद्यार्थ्यांसाठी शिक्षण अधिक कठीण होऊ शकते. त्यामुळे शिक्षणाचा सर्वसमावेशक स्वरूप टिकवणे हे एक मोठे आव्हान ठरेल.

सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेचा पाया हा समता आणि आरक्षण या तत्त्वांवर आधारित आहे. अनुदानित महाविद्यालयांमध्ये आरक्षण धोरणामुळे मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना समान संधी मिळते. खाजगी विद्यापीठांमध्येही हे तत्त्व कायम राहण्यासाठी स्पष्ट आणि बंधनकारक धोरण आवश्यक आहे. अन्यथा, शिक्षण क्षेत्रात असमानता वाढण्याची शक्यता निर्माण होईल.

शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या दृष्टीनेही हा बदल निर्णायक ठरू शकतो. अनुदानित व्यवस्थेत नोकरीची सुरक्षितता, नियमित वेतन आणि इतर सेवा सुविधा यामुळे स्थैर्य मिळते. परंतु खाजगी व्यवस्थेत सेवाशर्ती, वेतन आणि नोकरीची हमी यामध्ये बदल होण्याची शक्यता असते. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी शासनाने स्पष्ट आणि ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.

या सर्व प्रक्रियेत सार्वजनिक मालमत्तेचा मुद्दाही तितकाच महत्त्वाचा आहे. अनेक अनुदानित महाविद्यालयांना शासनाने जमीन, इमारती आणि इतर सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. अशा मालमत्तेचा वापर खाजगी विद्यापीठांसाठी केला जाणार असल्यास, त्यामध्ये पारदर्शकता आणि सार्वजनिक हिताचे संरक्षण करणे अत्यावश्यक ठरते. अन्यथा, सार्वजनिक संसाधनांच्या वापराबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतात.

राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२० च्या संदर्भात बहुविद्याशाखीय संस्थांची उभारणी, संशोधनाला चालना आणि शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे ही त्याची प्रमुख उद्दिष्टे आहेत. या धोरणाच्या अनुषंगाने बदल करणे आवश्यक असले, तरी त्यात सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशकता या मूल्यांचा समतोल राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. या निर्णयाचे सामाजिक आणि राजकीय परिणामही संभवतात. शिक्षक संघटना, विद्यार्थी आणि समाजातील विविध घटक यांच्यात या विषयावर चर्चा आणि मतभेद निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रक्रियेत सर्व संबंधित घटकांचा सहभाग, संवाद आणि सहमती यांना प्राधान्य देणे आवश्यक ठरते.

एकंदरीत अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे खाजगी विद्यापीठांमध्ये रूपांतर हा एक बहुआयामी विषय आहे. तो केवळ शिक्षणाच्या संरचनेतील बदल नसून सामाजिक, आर्थिक आणि नैतिक मूल्यांशी संबंधित आहे. या प्रक्रियेमुळे शिक्षण क्षेत्रात नवी निर्माण होऊ शकतात असे शासनाचे पाठीराखे म्हणतात , परंतु त्याचवेळी काही गंभीर आव्हानेही उभी राहू शकतात.

उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, शासनाने अंतिम धोरण तयार करताना अत्यंत समतोल आणि दूरदृष्टीचा दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक ठरते. स्वायत्तता, गुणवत्ता आणि स्पर्धात्मकता यांना प्रोत्साहन देताना सामाजिक न्याय, सर्वसमावेशकता आणि सार्वजनिक हित या मूलभूत मूल्यांचे संरक्षण करणे हेच या प्रक्रियेच्या यशाचे खरे मापदंड असतील. हा प्रश्न केवळ एका धोरणापुरता मर्यादित नसून शिक्षणाच्या मूलभूत स्वरूपाशी निगडित आहे. शिक्षण हे समाजघटकांना सक्षम करणारे साधन राहणार की ते केवळ बाजारपेठेतील एक 'उत्पादन' बनणार, याचा निर्णायक क्षण आज आपल्या समोर उभा आहे.

म्हणूनच, शासनाने हा निर्णय घेताना केवळ अनुदानाच्या आर्थिक जबाबदारीतून मुक्त होण्याचा सोपा मार्ग स्वीकारू नये. उलट, शिक्षणाच्या सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत, दीर्घकालीन परिणामांचा विचार करून, सर्व घटकांच्या हिताचे रक्षण करणारे आणि शिक्षण व्यवस्थेला अधिक सक्षम, न्याय्य व सर्वसमावेशक बनविणारे धोरण स्वीकारणे हीच काळाची गरज आहे हे मात्र निश्चित !



**डॉ. प्रशांत विघे**
**राजकीय विश्लेषक तथा सिनेट सदस्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती**
**९३२६८७७७४९**

# मेहंदीऐवजी मृत्यूची सावली प्री-वेडिंग ठरले काळ!

**आनंदाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या एका कुटुंबावर काळाने असा घाला घातला की, क्षणात सर्व काही उद्ध्वस्त झाले आणि कारण ठरला केवळ प्री-वेडिंगचा अट्टाहास!**

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव तालुक्यातील एका सुसंस्कृत कुटुंबात लग्नाची लगबग सुरू होती. घरात आनंदाचे वातावरण होते. अंगणात मांडव उभारला जाणार होता, सनई-चौघड्यांचे सूर घुमणार होते. ३ मे २०२६ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव येथील उपवर मुलासोबत त्या लेकीचा विवाहसोहळा पार पडणार होता. आई-वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू, भावंडांच्या चेहऱ्यावर उत्साह... आणि बापाच्या मनात आपल्या लेकीच्या स्वप्नांना पूर्ण करण्याची धडपड सुरू होती.

वर्षानुवर्षे कष्ट करून त्या पित्याने पै-पै साठवली होती. लेकीच्या लग्नासाठी साड्या, दागिने, पाहुण्यांच्या जेवणाची सर्व तयारी मोठ्या हौसेने केली होती. महिनाभर आधीच घरात किराणा भरून ठेवला होता. "माझ्या लेकीच्या लग्नात कुणालाही कमी पडू नये," हीच त्याची मनापासून इच्छा होती.



परंतु, वेगळेपणाच्या नादात आणि आठवणी जपण्याच्या इच्छेने प्री-वेडिंग शूट करण्याचा निर्णय घेतला गेला. सुंदर लोकेशन, आकर्षक फोटो आणि व्हिडिओ... या सगळ्याच्या मोहात रणरणत्या उन्हात शूट करण्याचे ठरले. त्या दिवशी तापमान ४३ अंशांच्या पुढे गेले होते. एसी गाडीचा गारवा आणि बाहेर पडताच अंगावर कोसळणारे कडक ऊन... शरीराला सहन होण्यापलीकडचा ताण निर्माण झाला. त्या कोवळ्या जीवाने हा तडाखा सहन केला नाही. उष्माघाताने ती गंभीर आजारी पडली. सुरुवातीला किरकोळ वाटलेले लक्षणे हळूहळू भीषण रूप धारण करू लागली. रुग्णालयात दाखल केल्यानंतर काही दिवस ती मृत्यूशी झुंज देत होती. डॉक्टरांचे प्रयत्न, कुटुंबीयांच्या प्रार्थना... सर्व काही सुरू होते. पण अखेर नियतीपुढे सर्वच हतबल ठरले... आणि त्या लेकीने अखेरचा श्वास घेतला.

ज्या हातांवर मेहंदी रंगणार होती, त्याच हातांनी आयुष्याची दोरी सोडली...ज्या डोक्यावर अक्षता पडणार होत्या, तिथे आज शोककळा पसरली...ज्या लेकीला डोलीत बसवून सासरी पाठवायचं होतं, तिला खांद्यावर घेऊन स्मशानात न्यावं लागलं...या घटनेतील सर्वात हृदयद्रावक प्रसंग म्हणजे त्या पित्याची हतबलता. लेकीच्या लग्नासाठी मोठ्या हौसेने भरून ठेवलेला किराणा... तोच आता तिच्या तेराव्याला वापरावा लागला. ज्या ताटात आनंदाने जेवण वाढायचे होते, तिथे आज दुःखाचे अश्रू वाढले जात आहेत.

घरात जिथे मंगलाष्टकांचा गजर व्हायला हवा होता, तिथे आज हंबरडा आणि शांततेचा आवाज घुमतो आहे...

आईच्या डोळ्यांतील आनंद कायमचा हरवला आहे...

आणि बापाच्या मनात एकच वेदनादायक प्रश्न घुमतोय—

"माझ्या लेकीसाठी सगळं केलं... पण तिचं आयुष्यच वाचवू शकलो नाही..."

ही घटना केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नाही, तर संपूर्ण समाजासाठी एक गंभीर इशारा आहे!

आज लग्न म्हणजे संस्कारांचा उत्सव न राहता, तो सोशल मीडियाचा दिखावा बनत चालला आहे. दोन मिनिटांच्या व्हिडिओसाठी, काही लाईक्ससाठी आपण जिवाचा धोका पत्करतो आहोत का? ऋतूमानाचा विचार न करता, निसर्गाच्या नियमांना आव्हान देत आपण स्वतःच संकट ओढवून घेतो आहोत का?

आज त्या वडिलांचे रिकामे घर, त्या आईचे अश्रू, आणि त्या होणाऱ्या नवऱ्याचा सुन्न चेहरा एकच संदेश देतो—

"दिखाव्याचा अट्टाहास... आयुष्यापेक्षा मोठा नसतो!"

लग्न साजरे करा, आनंदाने करा... पण जिवाच्या किंमतीवर नाही!महागडे कॅमेरे, सुंदर लोकेशन्स... हे सर्व मिळूनही गेलेली माणसे परत आणू शकत नाहीत.ही शोकांतिका पुन्हा कुणाच्या वाट्याला येऊ नये...हीच समाजाला कळकळीची विनंती!

# सणसर-लासुर्णे जिल्हा परिषद गटातील लोडशेडिंग होणार बंद ?

## जिल्हा परिषद सदस्य यांची महावितरण अधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : सणसर-लासुर्णे जिल्हा परिषद गटातील नागरिकांना जिल्हा परिषद सदस्या मा.सौ.माधुरी सागर भिसे यांच्याकडून ठाम आव्हान करण्यात आले होते की,रात्री 6 ते 10 या वेळेत सुरू असलेली लोडशेडिंग नागरिकांसाठी असह्य ठरत आहे. या अन्यायकारक परिस्थितीमुळे गटातील नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. बुधवार दि. 29 एप्रिल रोजी



ऊर्जा भवन,बारामती येथे महावितरणच्या अधिकाऱ्यांना भेटून सणसर-लासुर्णे गटातील नागरिकांना घरगुती 24 तास वीज पुरवठा उपलब्ध व्हावा म्हणून भेट घेण्यात आली यावेळी सकारात्मक चर्चा करण्यात आली.या चर्चेतून नागरिकांच्या हक्कासाठी ठोस पावले उचलली जातील,असा विश्वास भिसे यांनी व्यक्त करण्यात आला. याबैठकीत कमीत कमी 20 ते 25 घरे असणाऱ्या गावांना/वाडीवस्त्यांना पहिले प्राधान्य देऊन 24 तास वीज पुरवठा सुरू करण्याचा प्रयत्न केला जाईल.नागरिकांनी तातडीने संपर्क साधून आपली मागणी नोंदवावी.वीज ही केवळ सुविधा नाही,तर प्रत्येक घराचा हक्क आहे.अंधारात बसून त्रास सहन करणे ही नागरिकांची नियती असू शकत नाही अस मत महावितरण अधिकारी यांनी यावेळी व्यक्त केले.

आपल्या हक्कासाठी आवाज उठवणे हीच खरी जबाबदारी आहे. या लढ्यात प्रत्येक नागरिकाने सहभागी होऊन आपल्या गावाला उजेड देण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजेत असे आवाहन भिसे यांनी व्यक्त केले.

# रुई-खेडलेझुंगे बोरमाथा रस्ता वादग्रस्त; अडथळे न हटल्यास शेतकऱ्यांचा सामुदायिक आत्मदहनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी** :-निफाड तालुक्यातील रुई ते खेडलेझुंगे बोरमाथा या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामात अडथळे निर्माण होत असल्याने ग्रामस्थांचा संताप अनावर झाला आहे. संबंधितांवर तातडीने कारवाई न झाल्यास दि. ४ मे रोजी ग्रामपंचायत कार्यालयासमोर विष प्राशन करून सामुदायिक आत्मदहन करण्याचा गंभीर इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

रामदास दगू तासकर यांच्यासह शेतकऱ्यांनी तहसीलदार व उपविभागीय पोलिस अधिकारी, निफाड यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, जिल्हा परिषद मार्ग क्रमांक २६६ अंतर्गत जुना रुई ते खेडलेझुंगे बोरमाथा हा सुमारे दोन किलोमीटरचा रस्ता गेल्या वीस वर्षांपासून अत्यंत खराब अवस्थेत होता. या मार्गालगत ४० ते ५० घरांची वस्ती असून शेतमाल वाहतूक, विद्यार्थ्यांची ये-जा तसेच आपत्कालीन वैद्यकीय सेवांसाठी हा रस्ता अत्यंत आवश्यक आहे.

रस्त्याच्या दुरवस्थेमुळे ग्रामस्थांनी दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालयासमोर चार दिवस आमरण उपोषण केले होते. त्यानंतर प्रशासनाने हस्तक्षेप करत काम सुरू करण्याचे आश्वासन दिले. पुढे दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी सरकारी मोजणी, तर दि. २३ जानेवारी २०२६ रोजी हद्दी निश्चित करण्यात आल्या आणि कामाला सुरुवात झाली.

मात्र, काही संबंधितांकडून खोटे आरोप करत ठेकेदार व ग्रामस्थांना अडथळे निर्माण केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

परिणामी सध्या काम ठप्प झाले असून ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे.प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून अडथळे दूर करावेत, अन्यथा ४ मे रोजी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. त

सेच या प्रकरणात कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र मंत्रिमंडळाचे महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आले. कृत्रिम बुद्धिमत्ता, शिक्षण, हरित ऊर्जा, सामाजिक न्याय आणि पर्यावरण या क्षेत्रांना चालना देणारे हे निर्णय ठरले आहेत.राज्यात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) धोरण २०२६ जाहीर करण्यात आले असून, या धोरणांतर्गत १० हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक अपेक्षित आहे. यामुळे सुमारे दीड लाख रोजगार निर्मिती होणार आहे. राज्यभरात सहा एआय उत्कृष्टता केंद्रे आणि पाच एआय इनोव्हेशन सिटीज उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सामाजिक समता वर्षानिमित्त, लंडनमधील प्रतिष्ठित London School of Economics and Political Science येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने कायमस्वरूपी अध्यासन स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. यामार्फत विद्यार्थ्यांना डॉक्टरेटसाठी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.पर्यावरण संरक्षणासाठी हरित महाराष्ट्र आयोग स्थापन करण्यात येणार असून, राज्यात ३०० कोटी वृक्ष लागवडीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. याशिवाय हरित ऊर्जा क्षेत्राला बळकटी देण्यासाठी MAGESTIC योजना राबविण्यात येणार असून, यासाठी जागतिक बँकेकडून कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मोठा दिलासा देत, उच्च शिक्षणासाठीच्या शिष्यवृत्तीत तब्बल १२ वर्षांनंतर वाढ करण्यात आली आहे. यामध्ये शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, नोंदणी व इतर आवश्यक खर्चाचा समावेश असेल.रत्नागिरी जिल्ह्यातील नाचणे येथे Kendriya Vidyalaya Sangathan अंतर्गत नवीन केंद्रीय विद्यालय उभारण्यासाठी अडीच हेक्टर जमीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच, आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

# अपघाताने कर्ता हरपलेल्या दुर्गम कुटुंबाला दिलासा; राजे अम्ब्रीशराव महाराजांचा माणुसकीचा हात पुढे

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : तालुक्यातील टेकडा येथील महेश मयसय्या दुर्गम यांच्या अपघाती निधनानंतर दुर्गम कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असतानाच माजी राज्यमंत्री तथा अहेरी इस्टेटचे राजे अम्ब्रीशराव महाराज यांनी तत्परतेने मदतीचा हात पुढे करून माणुसकीचा आदर्श घालून दिला.

तालुका दौऱ्यावर असताना ही दुर्दैवी घटना समजताच राजे साहेबांनी वेळ न दवडता थेट दुर्गम कुटुंबाच्या घरी जाऊन सांत्वनपर भेट दिली. कुटुंबीयांशी आपुलकीने संवाद साधत त्यांनी त्यांच्या दुःखात सहभाग नोंदवला आणि या



कठीण प्रसंगी आपण त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत, असा दिलासा दिला.

या भेटीदरम्यान राजे साहेबांनी कुटुंबाला तातडीची आर्थिक मदत जाहीर केली. तसेच, दुर्गम कुटुंबातील मुलांच्या उच्च शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी उचलण्याचे आश्वासन देत त्यांच्या भविष्यासाठी भक्कम आधार निर्माण करण्याचा विश्वास व्यक्त केला.

राजे अम्ब्रीशराव महाराज यांच्या या संवेदनशील व मानवतावादी कृतीमुळे परिसरात त्यांच्याबद्दल आदराची भावना अधिक दृढ झाली असून, सामाजिक बांधिलकी जपणारा नेता म्हणून त्यांची प्रतिमा पुन्हा अधोरेखित झाली आहे.

या प्रसंगी युवा नेते कुमार अवधेशराव बाबा आत्राम, दुर्गम कुटुंबातील सदस्य तसेच स्थानिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात**
**तालुका खालापूर, जि. रायगड**
**दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ईमेल- tahasil.khalapur3@gmail.com**

---

क्र. जन्म/रजि./एसआर ५८/२०२६

१) श्रीम. निजाम इसहख खान
रा. रिस मोहोपाडा, ता. खालापुर, जि. रायगड — वादी

**विरुध्द**

१) निबंधक, जन्म - मृत्यु नोदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मोहोपाडा, ता. खालापूर, जि. रायगड — प्रतिवादी

---

**विषयः- जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्रीम. निजाम इसहख खान, रा. रिस मोहोपाडा, ता. खालापुर, जि. रायगड (अपिलार्थी) यांच्या मुलीचा जन्म श्रीम. सोफीया निजाम खान दि. २२/०५/२००० रोजी मौजे मोहोपाडा, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर जन्माची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे जन्माची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वताः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाची ही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.
सदरची जाहीर नोटीस आज दि ०४/०५/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

**ठिकाण:- खालापूर**
**दिनांक ०४/०५/२०२६**

**(अभय चव्हाण)**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार खालापूर**

## जाहीर नोटीस

नमुना एन डी
(नियम ९२(३) पहा)
लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46AZ7893 चे मालक कै.बाळाराम बबन कडू याचं दिनांक 07/05/2021 रोजी निधन झाले आहे.

**मी**
**अपर्णा बाळाराम कडू**
**विलेज -चिंद्रण, पो - देवीचापाडा, ता - पनवेल, महाराष्ट्र, रायगड - 410206**

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे. याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव-**
**अपर्णा बाळाराम कडू**
**विलेज - चिंद्रण, पो - देवीचा पाडा ता - पनवेल, महाराष्ट्र, रायगड - 410206.**

# सुझुकी एक्सेस स्कूटरला अज्ञात वाहनाची धडक, पारगाव येथील सुमित तारेकर यांचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : सुझुकी एक्सेस स्कूटरला अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत झालेल्या अपघातात पारगाव येथील सुमित बळीराम तारेकर (वय 35) याचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी 28 एप्रिल रोजी कामोठे पोलीस ठाण्यात अनोळखी वाहन चालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सुमित बळीराम तारेकर ( राहणार पारगाव) हा त्याचा मित्र ओमकार कुबल याची सुझुकी एक्सेस स्कूटर क्रमांक एम एच 46 सी क्यू 2286 यावरून 28 एप्रिल रोजी रात्री तीनच्या सुमारास कळंबोली सर्कलच्या दिशेने जात होता. टी पॉइंट कडून कळंबोली सर्कल कडे जाणाऱ्या हायवेवरील धाकटा खांदा गावाजवळील ब्रिज शेजारील लेनवर अज्ञात वाहन चालकाने त्याच्या स्कूटरला धडक दिली. या झालेल्या अपघातात सुमित याच्या डोक्याला गंभीर दुखापती झाल्या आणि तो जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला.

या अपघाता प्रकरणी कामोठे पोलिसांनी अनोळखी वाहन चालका विरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# मला जे पाहिजे ते मी घेणार" जर माझ्याविरुद्ध कोणी गेल्यास मी त्यांना धडा शिकवेन ना. इंद्रनील नाईकांनी स्थानिक प्रशासनातील अधिकारी व कंत्राटदारांना दिली तंबी; बैठकीतील इनसाइड स्टोरी!

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड (मोहदरी) :** पुसद शहरात नुक्तिच मतदार संघातील विविध स्थानिक विकास कामांचा वेग वाढवणे आणि प्रशासकीय अडचणी दूर करणे तसेच चालू असलेल्या विकास कामाची ( रस्ते पाणीपुरवठा शिक्षण आरोग्य) सद्यस्थिती आणि प्रगती तपासण्या साठी राज्याच्या सहा विभागाच्या खात्याचे राज्यमंत्री असलेले ना. इंद्रनील नाईक यांच्या अध्यक्षतेखाली उपविभागीय कार्यालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले परंतु ही बैठक त्या ठिकाणाहून वनविभागाच्या मुख्य कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आली परंतु या आढावा बैठकीचे मुख्य फलित म्हणजे स्थानिक विकासाचा वेग वाढवणे आणि प्रशासकीय अडचणी दूर करणे हा होता.स्थानिक विविध विभागाचे अधिकारी, राज्यमंत्री यांच्यात समन्वय साधून प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावले पाहिजे होते

परंतु मंत्र्यांनी स्थानिक सर्व विभागाच्या अधिकाऱ्याला व कंत्राटदाराना कामात हलगर्जी केल्यास व कामे वेळेवर पूर्ण न केल्यास "मला जे पाहिजे ते मी घेणार" जर माझ्याविरुद्ध किंवा जनते विरुद्ध कोणी गेल्यास मी त्यांना चांगला धडा शिकवेन अशी तंबी अधिकारी व शासकीय कंत्राटदारांना दिली आहे. मात्र विरोधकांनाही एक प्रकारे चेतावणी आहे विरोध कराल तर तुम्हालाही पाहू असाच संदेश तंबीतुन दिला आहे.या बैठकीचा उद्देश 'प्रशासनाला गती' आणि 'विकासकामांना दिशा' देणे गरजेचे होते मात्र या मतदार संघात असे होताना दिसून येत नाही या आढावा बैठकांचा उद्देश प्रशासकीय कामाचा आढावा घेणे असला, तरी अनेकदा त्याचा वापर पक्षीय ताकद दाखवण्यासाठीच केला की काय? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. खरीप हंगाम तोंडावर आला आहे मतदार संघातील सर्वांगीन

विकास करायचा असेल तर विकास कामातील टक्केवारीना हवा बसला पाहिजे तसेच अनुभवी कंत्राटदारांना कामे दिले पाहिजे परंतु ज्या कंत्राटदारांना त्या कामाचा कुठलाही अनुभव नसताना सुद्धा विकास कामे मंदिरातील प्रसाद वाटल्याप्रमाणे वाटली जात आहे. त्यामुळे मतदार संघातील अनेक कामे रेंगाळली आहे. जे कंत्राटदार कर्ज काढून कामे करीत आहेत त्यांना वेळेवर निधी उपलब्ध होत नाही जे निकृष्ट दर्जाचे कामे करत आहेत अशा कंत्राटदाराचे चांगभले सुरू आहे.हि आढावा बैठका केवळ फोटो सेशन आणि प्रसिद्धीसाठी नसली पाहिजे नाहीतर मतदार संघातील प्रत्यक्षात प्रश्न सुटण्या ऐवजी प्रश्न रेंगाळत पडतील बैठकीत दिलेल्या सूचनांची किंवा निर्णयांची प्रत्यक्ष जमिनीवर अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र दिसून येत आहेत. या आढावा बैठकीतील मुख्य मुद्दा शेतीसाठी रक्तवाहिनी आलेल्या शेत रस्त्याचे मजबुतीकरण करण्यासाठी राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा शेत व पांदण रस्त्यांना राजाश्रय देण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्त्यांची योजनांचा अंमलबजावणी करण्यासाठी सक्तीचे पाऊल उचलले आहे प्रत्येक लोकप्रतिनिधीच्या मतदारसंघात समीती गठण करून प्रगतशील शेतकऱ्यांचा समावेश करण्याचे सक्त आदेश जारी केले असताना सुद्धा या आढावा बैठकीला मुख्य लाभार्थी असलेल्या



शेतकऱ्यांना बाजूला ठेवून केवळ राजकीय कार्यकर्ते नेते आणि अधिकारी निर्णय घेत असल्याचा आरोप मतदारसंघांतील शेतकरी करीत आहेत थोडक्यात, अशा बैठका शासकीय कामकाजाचा भाग म्हणून कागदोपत्री पूर्ण केल्या जातात, परंतु त्यातून सामान्य जनतेच्या समस्यांचे निराकरण होत नसल्याची भावना निर्माण झाली आहे.अनेकदा या बैठकांमध्ये मंत्र्यांचा अधिकाऱ्यांशीच जास्त संवाद होतो, शेतकरी व सामान्य नागरिकांना तसेच पत्रकारांना या बैठकीपासुन डावल्याने मतदार संघातील समस्या सुटत नाही. पण या आढावा बैठकीला पत्रकाराची ' सुद्धा अलर्जी' होती प्रशासकीय कामात पारदर्शकता आणण्यासाठी पत्रकारांची उपस्थिती म्हत्वाची असते परंतु या आढावा बैठकी पासून पत्रकारांना जाणीवपूर्वक दूर ठेवले हा निर्णय लोकशाहीत पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे. या आढावा बैठकीत पत्रकारांना दूर ठेवण्यात आल्याने या बैठकीतील खरी माहिती बाहेर येत नाही यामुळे गैरव्यवहार किंवा अपयश झाकले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तर अनेकदा प्रशासनातील अधिकारी किंवा लोकप्रतिनिधीच्या चुकीच्या कामाची माहिती पत्रकाराच्या माध्यमातून बाहेर पडण्याची भीती असल्यामुळेच या आढावा बैठकीत पत्रकारांना प्रवेश नाकारला असल्याचे चर्चा जोरात सुरू आहे. पत्रकारांना आढावा बैठकीपासून लांब ठेवणे म्हणजे लोकशाही च्या चौथ्या स्तंभाला कमकुवत करण्यासारखे आहे आयोजक प्रशासनाने व लोकप्रतिनिधींनी हे कार्य जाणीवपूर्वक केले आहे. मतदारसंघातील शहरी आणि ग्रामीण भागात रस्ते, आरोग्य, पाणीपुरवठा, मलनिस्सारण आणि घनकचरा व्यवस्थापनासाठी अदि विकास पांदण रस्ते नाला खोलीकरण सरळीकरण या कामांसाठी शासनाचा निधी उपलब्ध करून दिला जातो, तरीही प्रत्यक्ष या कामांमध्ये मोठी तफावत दिसून येते. या स्थानिक प्रशासनातील २२ विभागातील अनेक कामे भ्रष्टाचाराने बरबटले आहे अनेक ठिकाणी आवश्यक सुविधा मिळवण्यासाठी नागरिकांना संघर्ष करावा लागतो.मग शासनाचा हा विकास निधी पाझरतो तरी कुठे? असा प्रश्न सर्वसामान्यांना निर्माण

**शेतीची रक्तवाहिनी असलेल्या पांदण रस्त्याच्या मुद्द्यावरी**
**बैठकीत प्रगतिशील शेतकरी उपस्थित नसतील तर ही बैठक अर्थहीन!**

**उपविभागीय अधिकाऱ्यांनी राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या स्थानिक प्रशासनातील २२ विभागांच्या अधिकाऱ्यासोबतची आढावा बैठक ऐनवेळी वन विभागाच्या कार्यालयात घेण्यात आली परंतु या बैठकीत शेतीची रक्तवाहिनी असलेल्या पांदण रस्त्याच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी मतदारसंघातील प्रगतीशील शेतकरी किंवा शेतकऱ्याचा प्रतिनिधी उपस्थित नव्हता तर मुख्यमंत्री बळीराजा शेत व पांदण रस्त्याच्या योजनेची प्रभावी अंमलबजावणी कशी होणार किंवा मतदार संघातील शेतकऱ्याचे इतर प्रश्न प्रलंबित पिक विमा , खतटंचाई व बोगस खत बियाणे या ज्वलंत विषयावर चर्चा नाही खरीपापुर्वी शासनाने दिलेले पांदण रस्त्याचे उद्दिष्ट पूर्णत्वास जाणार की,नाही याबद्दल शंका आहे. पुसद मतदार संघात विकास कामाला वाळवी लागली आहे या आढावा बैठकीला राजकीय कार्यकर्त्यांना संधी मिळते परंतु शेतकऱ्यांचा समावेश या बैठकीत केला जात नाही ही मोठी शोकांतिका आहे. त्यामुळे ही आढावा बैठक कागदांवरच असल्याने आणि शेतकरी उपस्थित नसल्याने बैठक अर्थहीन आहे.**

**-मनीष जाधव, शेतकरी नेते.**

झाला आहे. त्यामुळे या मतदारसंघात अनेक विकास कामे रखडली असून काही विकास कामे संथगतीने सुरू आहेत तर अनेक विकास कामांना टक्केवारीचे ग्रहण लागले आहे तर काही विकास कामे अर्धवट आहेत तर काही विकास कामे कागदोपत्री सुरू असुन लोकप्रतिनिधींचे कार्यकर्ते व पक्षाचे पदाधिकारी हे विकास कामे करत असल्याने या मतदारसंघात भ्रष्टाचार बोकाळला आहे त्यामुळे प्रशासनातील अधिकारी सुध्दा भ्रष्ट कामे करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्यास धसत नाहीत किंवा त्यांना ब्लॅकलिस्ट करीत नाहीत कारण संबंधित अधिकाऱ्यांचे आर्थिक हितसंबंध गुंतलेले असतात त्यामुळे तर मंत्रीमहोदय ही कारवाईची अशी तंबी फक्त फोटो सेशनसाठी आहे कां.?असा प्रश्न मतदार संघातील नागरीकांकडुन विचारला जात आहे. कारण भ्रष्ट अधिकाऱ्यावर आजपर्यंत कारवाई झाल्याचे या मतदारसंघात चित्र पाहावयास मिळाले नाही तर उलट भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकारी आणि शासकीय कंत्राटदारांना पाठीसी घातले जात असल्याचे चित्र आहे.

या आढावा बैठकीला ना.इंद्रनिल नाईक राज्यमंत्री, उद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली पुसद नगर परिषदेच्या नगराध्यक्ष सौ.मोहिनीताई इंद्रनील नाईक, उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल तसेच

स्थानिक प्रशासनातील २२ विभागाच्या कार्यालयाचे अधिकारी त्यामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी, म.रा.वि.वि.के. मर्या.,कार्यकारी अभियंता, उपविभागीय कृषी अधिकारी, तहसिलदार,गटविकास अधिकारी, पं.स.पुसद,मुख्याधिकारी, नगर परिषद,तालुका कृषी अधिकारी, उपविभागीय अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, यवतमाळ, उपविभागीय अभियंता, सा.बां. विभाग, पुसद,उपविभागीय अभियंता, जि.प. बांधकाम विभाग,उपविभागीय अभियंता, जि.प., सिंचन विभाग,उपविभागीय अभियंता, म.जि.प्रा.,उपविभागीय अभियंता, पाटबंधारे उपविभाग क्रमांक तीन,वैद्यकिय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय,तालुका आरोग्य अधिकारी,उपअधिक्षक, भूमी अभिलेख,तालुका पशुसंवर्धन अधिकारी,सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,पशुधन विकास अधिकारी, पं.स.,उपअभियंता, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प, पैनगंगानगर (इसापुर धरण),उपअभियंता, ऊर्ध्व पुस प्रकल्प,वनपरीक्षेत्र अधिकारी, पुसद,मारवाडी व शेंबाळपिंपरी अधिकारी तसेच पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# जिद्द आणि चिकाटीचा विजय: शेतमजुराचा मुलगा बनला 'आदर्श शिक्षक

**दैनिक युवक आधार जळगाव**

**जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील :** शून्यातून विश्व निर्माण करण्याची जिद्द जर मनात असेल, तर परिस्थिती कधीच आडवी येत नाही, हे जळगावच्या योगेश महाजन यांनी सिद्ध करून दाखवले आहे. 'श्री क्लासेस', 'शीतल अकॅडमी' आणि 'श्री नेक्स्टजेन कॉम्प्युटर्स'चे संचालक योगेश महाजन यांना नुकताच 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. एका सामान्य शेतमजुराचा मुलगा ते एक यशस्वी शिक्षणतज्ज्ञ आणि उद्योजक असा त्यांचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे.

**संघर्षातून यशाकडे वाटचाल**

योगेश महाजन यांचा जन्म एका अत्यंत गरीब कुटुंबात झाला. त्यांचे वडील शेतमजुरी करून घराचा गाडा हाकवत असत. घरात शिक्षणाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना आणि आर्थिक ओढाताण असतानाही योगेश यांनी आपले शिक्षण जिद्दीने पूर्ण केले. शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी केवळ स्वतःची प्रगती केली नाही, तर समाजातील इतर विद्यार्थ्यांनाही सक्षम करण्याचा विडा उचलला.

**शैक्षणिक क्षेत्रातील योगदान**

योगेश महाजन यांनी आपल्या शैक्षणिक



कार्याची सुरुवात अत्यंत छोट्या स्तरावर केली. आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली:

श्री क्लासेस: हजारो विद्यार्थ्यांना शालेय व स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करत आहे.

शीतल अकॅडमी: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा इंग्रजी भाषेचा न्यूनगंड दूर करून त्यांना जागतिक स्तरावर स्पर्धेसाठी तयार करत आहे.

श्री नेक्स्टजेन कॉम्प्युटर्स: तांत्रिक युगाची गरज ओळखून विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्यात मोलाची भूमिका बजावत आहे.

**पुरस्काराने गौरव**

त्यांच्या या निस्वार्थ सेवेची आणि शैक्षणिक क्षेत्रातील क्रांतीची दखल घेऊन त्यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे

**"माझ्या वडिलांनी शेतात घाम गाळून मला शिकवले. हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून माझ्या आई-वडिलांच्या कष्टाचा आणि माझ्या विद्यार्थ्यांच्या विश्वासाचा आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक मुलगा तांत्रिकदृष्ट्या सक्षम व्हावा, हेच माझे ध्येय आहे."**

**— योगेश महाजन (संचालक, श्री क्लासेस, शितल अकॅडमी,व श्री नेक्स्टजेन कॉम्प्युटर्स एरंडोल)**

त्यांच्यावर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे. केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल, याकडे महाजन यांचा नेहमी कल असतो.

**तरुणांसाठी प्रेरणास्थान**

आजच्या युगात जिथे अनेक तरुण सोयीसुविधा नसल्याचे कारण पुढे करतात, तिथे योगेश महाजन यांनी आपल्या कतृत्वाने एक नवीन आदर्श निर्माण केला आहे. शेतमजुराचा मुलगा जर आज शेकडो तरुणांना रोजगार आणि शिक्षण देऊ शकतो, तर काहीही अशक्य नाही, अशी भावना परिसरात व्यक्त होत आहे.

# महापुरुषांसोबतच बुद्धीवंतांच्या स्मृती जपणे काळाची गरज.:- कर्नल कल्याण डोरले

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** समाजाच्या जडणघडणीत महापुरुषांचे योगदान अनमोल आहेच; मात्र देशाच्या प्रगतीसाठी आयुष्य वाहून घेणाऱ्या शास्त्रज्ञ व बुद्धीवंतांच्या कार्याचीही तितकीच दखल घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कर्नल कल्याण डोरले यांनी केले. दि.२५ एप्रिल रोजी पाटोदा नगर पंचायतच्या सभागृहात डॉ.के.कस्तुरीरंगन यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डॉॅ.के.कस्तुरीरंग याचे प्रथम स्मृतीदिनी पुढे बोलताना कर्नल डोरले म्हणाले की, "आपण महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजऱ्या करतो, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. परंतु त्याच बरोबर विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षण क्षेत्रात देशाचे नाव उंचावणाऱ्या डॉ.कस्तुरीरंगन यांच्या सारख्या शास्त्रज्ञांच्या कार्याची आठवण ठेवणे आणि त्यांचे स्मरण करणे ही सुद्धा काळाची गरज आहे."असे मत व्यक्त केले. तर आयोजक पद्माकरराव बिनवडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की संपुर्ण भारतातील ग्रामीण भागामध्ये स्मृतिदिन साजरा होणारी एकमेव घटना असावी तसेच कृषी शास्त्रज्ञ डॉ.स्वामीनाथन यांनी अन्नधान्याच्या बाबतीत भारताला नुसतेच




स्वयंपूर्ण बनले नाही तर निर्यातदार बनवले त्याची कार्याची दखल घेऊन त्यांना भारतरत्न देऊन सन्मानीत केले. तसेच अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना डॉ.सी.एन.राव यांनी अणुची दुसरी चाचणी यशस्वी केली, यांची ही दखल घेऊन त्याना भारतरत्नाने सन्मानीत करण्यात आले. तर भारत सरकारने डॉ.के.कस्तुरीरंगन यांच्या थोर कार्याची दखल घेऊन त्यांना मरणोत्तर भारतरत्न देण्याची मागणी केली. या वेळी आबासाहेब भोसले, शेतकरी नेते गणेश कवडे, राजाभाऊ देशमुख, सय्यद सज्जाद व शिवभूषण जाधव, वसंत बिनवडे यांनी उपस्थितांना डॉ.के.कस्तुरीरंगन यांच्या कार्याची माहिती दिली. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने अंतराळ संशोधन क्षेत्रात मिळवलेली प्रगती व जागतिक स्तरावर निर्माण केलेली ओळख याबाबत विशेष उल्लेख करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी असलेले जेष्ठ आदर्श शिक्षक रामराव डिडुळ यांनी त्यांच्या काळातील काही रोचक शैक्षणिक घटनांचा उल्लेख करत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी अशा उपक्रमांचे आयोजन नियमितपणे व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच आयोजक पद्माकरराव बिनवडे यांनी घेतलेल्या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

---

# विंचूरमध्ये पालखेड कालव्याची दुरवस्था; पाणी गळतीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

## सायफनजवळ भिंत पडझड, भराव खचला; ग्रामस्थांकडून तातडीच्या दुरुस्तीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी :** निफाड तालुक्यातील विंचूर परिसरातून जाणाऱ्या पालखेड डाव्या कालव्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, ठिकठिकाणी होत असलेल्या पाणी गळतीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी विंचूर येथील निलेश दगडूजी चव्हाण यांनी नाशिक येथील पालखेड पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देत तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.माहितीनुसार, डोंगरगाव रोडलगत सोनवणे वस्ती आणि ढवण वस्ती परिसरात कालव्याच्या सायफनजवळील भिंत कोसळली असून, दोन्ही बाजूंचा भराव मोठ्या प्रमाणावर खचला आहे. परिणामी या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाणी गळती होत आहे. तसेच



निमगाव रोड, सोनाराचा मळा आणि सांगळे वस्ती परिसरातही कालव्याचे कॉंक्रिटीकरण आणि भराव धोकादायक अवस्थेत आले असून, पाणी थेट शेतात शिरत आहे.विंचूर परिसर हा शेतीप्रधान असून येथे कांदा, मका, गहू, सोयाबीन यांसह द्राक्ष, पेरू आणि चिकू पिकांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. मात्र कालव्याच्या गळतीमुळे पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे."कालव्याच्या भिंतींना मोठी भगदाडे पडली असून भराव सातत्याने खचत आहे. वेळेत दुरुस्ती न केल्यास मोठी दुर्घटना घडू शकते," असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

■ सोनवणे वस्तीजवळील सायफन व भिंतीची तातडीने दुरुस्ती

■ खचलेल्या भरावाचे मजबुतीकरण

■ धोकादायक कॉंक्रिटीकरणाची कायमस्वरूपी सुधारणा

या निवेदनाची प्रत पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक येथे देण्यात आली असून, प्रशासन या गंभीर समस्येवर तातडीने काय कारवाई करते याकडे विंचूरकरांचे लक्ष लागले आहे.

# शहरात नागरिकांकडून पाणी वाटप टंचाईच्या काळात माणुसकीचा झरा सर्वत्र कौतुक

**दैनिक युवक अधार**

**मालेगाव तालुका प्रतिनिधी प्रकाश भुरे :** मालेगांव शहरात वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची यंत्रणा संथ असताना काही सजग नागरिकांनी पुढाकार घेत माणुसकीचा आदर्श घालून दिला आहे येथील सोनू बळी व नितीन बळी यांनी स्वखर्चाने शहरातील प्रभाग क्रमांक १५ व १२ मध्ये पाणी वाटप सुरू करून तहानलेल्या नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे

जनसेवा हीच ईश्वर सेवा या भावनेतून सुरू केलेल्या या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळत असून नागरिकांकडून या कार्याचे जोरदार स्वागत व कौतुक होत आहे उन्हाच्या कडाक्यात पाण्यासाठी भटकंती करणाऱ्या नागरिकांना थेट घराजवळ पाणी मिळाल्याने समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे

दरम्यान या घटनेमुळे नगरपंचायतीच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे शहरात तीव्र पाणीटंचाई जाणवत असतानाही अद्याप टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे

नागरिकांच्या मते शहरातील प्रत्येक प्रभागात किमान दोन टँकर दिवस रात्र सुरू केल्यास



मोठ्या प्रमाणात समस्या सुटू शकते मात्र यासाठी नगरपंचायतीने तातडीने ठोस पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे एकीकडे प्रशासनाची निष्क्रियता तर दुसरीकडे नागरिकांची पुढाकार घेण्याची वृत्ती या विरोधाभासामुळे खऱ्या अर्थाने लोकसेवा कोण करतंय असा सवालही आता उपस्थित होत आहे .

## जनगणनेच्या पार्श्वभूमीवर पनवेल तहसील कार्यालयामार्फत व्यापक तयारी




**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** भारत सरकारच्या आगामी जनगणना 2027 या राष्ट्रीय उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर पनवेल तहसील कार्यालयामार्फत व्यापक तयारी सुरू करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी रायगड माननीय किशन जावळे (भारतीय प्रशासकीय सेवा), उपविभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक, तहसीलदार पनवेल मीनल भोसले भामरे तसेच अप्पर तहसीलदार जितेंद्र इंगळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना 2027 साठी नियोजनबद्ध कार्यवाही सुरू असून, सुमारे 1800 प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण पार पाडण्यात येत आहे. या अनुषंगाने प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण 23 एप्रिल 2026 ते 8 मे 2026 या कालावधीत सिकेटी ज्युनिअर कॉलेज, नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आले आहे. पनवेल शहराची सुमारे 7 लाख 29 हजार इतकी मोठी लोकसंख्या लक्षात घेता, जनगणनेचे कार्य प्रभावीपणे पार पाडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली आहे.


या प्रशिक्षणामध्ये विविध शाळांतील शिक्षक तसेच शासकीय कर्मचाऱ्यांचा समावेश असून, त्यांना सकाळी 9 ते सायंकाळी 5 या वेळेत सखोल प्रशिक्षण दिले जात आहे. प्रशिक्षणाच्या पहिल्या दोन दिवसांत जनगणनेची सैद्धांतिक माहिती देण्यात येते, तर तिसऱ्या दिवशी क्षेत्रीय (फिल्ड) प्रशिक्षण दिले जाते. तसेच नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी 1 मे 2026 ते 15 मे 2026 या कालावधीत स्वगणना बाबत जागरूकता निर्माण करण्यात आली आहे. यानंतर 16 मे ते 14 जून या कालावधीत घरगुती गणना हा जनगणनेचा पहिला टप्पा पूर्ण करण्यात येणार आहे. पनवेल तहसील कार्यालयामार्फत या राष्ट्रीय कर्तव्यासाठी योग्य नियोजन, समन्वय व प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे दिसून येत असून, संपूर्ण यंत्रणा तत्परतेने कार्यरत आहे.

# अकोला जिल्ह्यात उष्मालाट दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी/ अकोला :** अकोला जिल्ह्यात 29 एप्रिल ते दि. 3 मे दरम्यान उष्णतेची लाट राहील, तसेच या कालावधीत अवेळी पावसाची शक्यताही नागपूर येथील प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तविली आहे. या काळात नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

यादरम्यान ताशी 40 ते 50 किमी प्रतितास याप्रमाणे हवेचा वेग राहण्याची शक्यता आहे. त्यानुसार आवश्यक दक्षता घेण्याबाबत सुचित करण्यात येत आहे. उष्मालाट असल्याने दुपारी 12.00 ते 4.00 या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे, बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत,उन्हात वाहने शक्यतो चालवू नये, ज्वलनशील पदार्था पासून शक्यतो दूर राहावे. लहान मुले व पाळीव प्राण्यांना गेट बंद असलेल्या वाहनात तसेच पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये. तहान लागलेली नसली तरी जास्तीत



जास्त पाणी पिण्यात यावे. अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. पशुधनास तसेच पाळीव प्राण्यांना छावणीत ठेवण्यात यावे. तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी देण्यात यावे.

वीज, वारा व पावसापासून बचावाकरिता सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्यात यावा. अशा स्थितीत झाडाखाली आश्रय घेऊ नये. पाऊस व विजांच्या स्थितीत मोबाईल फोनचा उपयोग टाळावा. शेतक-यांनी आपला शेतमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा.

**कामगार व नागरिकांच्या संरक्षणासाठी तातडीच्या उपाययोजना**

उष्मालाटेमुळे सर्वाधिक प्रभावित होणारे घटक म्हणजे बांधकाम कामगार, वीटभट्ट्या कामगार, खाणकाम, शेती आणि असंघटित क्षेत्रातील कामगार आहेत. त्यासाठी विविध विभाग, यंत्रणा, आस्थापनांनी कार्यस्थळावर उपाययोजना करण्याचे निर्देश आहेत. तीव्र उष्णलाटांपासून बचावासाठी कामाचे वेळापत्रक पुन्हा नियोजित करावे. याबाबत वेळोवेळी आढावा घेऊन कार्यवाही करावी.

कार्यस्थळी उन्हापासून बचावासाठी पुरेशी व्यवस्था करावी. तसेच सदर ठिकाणी विश्रांती व्यवस्था करावी. आवश्यकतेनुसार कुलर व अनुषंगिक व्यवस्था सुनिश्चित करावी. पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी, इलेक्ट्रोलाइट पूरक पदार्थ, आणि आपत्कालीन आईस पॅक उपलब्ध करून देण्यात यावे. कामगारांच्या नियमित आरोग्य तपासणीसाठी आरोग्य विभागाशी समन्वय साधून करण्यात यावी.

उष्णतेचा ताण जाणवत असल्यास कामगारांना कामाचा वेग कमी करण्यास परवानगी देण्यात यावी.जड कामे दिवसातील थंड वेळेत होतील याबाबत नियोजन करावे.

अत्यंत उष्णतेच्या परिस्थितीत कामासाठी दोन व्यक्तींच्या पथकाची अट (mandate) लागू करण्यात यावी. कार्यस्थळाजवळ विश्रांतीसाठी जागा उपलब्ध करून देणे आणि थंड पाण्याची व्यवस्था सुनिश्चित करावी.

कामगार काम करीत असलेला भाग, ठिकाणे व सार्वजनिक ठिकाणी उष्णतेच्या धोक्यांविषयी जनजागृती मोहिमा राबविण्यात यावी. असुरक्षित गटांवर विशेष लक्ष केंद्रित करावे: बांधकाम कामगार, वीटभट्टी कामगार, दैनंदिन मजूर आणि असंघ

**टित क्षेत्रातील कामगार.**

जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुख व प्रामुख्याने उपसंचालक औदयागिक सुरक्षा, सहायक आयुक्त कामगार कल्याण यांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

## मद्यधुंद पोलिस कर्मचारी संजय जगतापची बेदरकार गाडी; गोकुळेश्वर अपघातात तिघे जखमी, रेवदंडा हफ्तावसुलीचे आरोप

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** गोकुळेश्वर स्टॉप येथे मंगळवारी (दि. २८ एप्रिल) रात्री ८.४५ वाजता संजय रमेश जगताप (रा. अलिबाग) यांच्या मद्यधुंद मारुती वेगनार कारने राँग साईडने पिकअप आणि स्कुटीला धडक दिली. अलिबाग पोलिस विभागात कार्यरत आणि मुख्यालयात नियुक्त असलेल्या जगताप यांच्या या बेदरकार वाहन चालवणुकीमुळे साखळी अपघात झाला.




या अपघातात पिकअपमधील मयंक हसमुख काराणी (३२, रा. शेखाचेगाव), धीरज शहा आणि स्कुटीवरील व्यक्ती जखमी झाले. तिघांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, तिन्ही वाहनांचे प्रचंड नुकसान झाले. वाहतूक विस्कळीत झाली होती.

**रेवदंडा स्टेशनहद्दीत भ्रष्टाचाराचे आरोप**

जगताप यांच्या रेवदंडा पोलिस स्टेशनमधील कारकिर्दीवर गावठी दारू, गांजा, मटका, पत्त्याच्या क्लबमधून हफ्तावसुलीचे गंभीर आरोप आहेत. पैशासाठी त्रास, जमीनजुमला आणि पैसे खाण्याच्या तक्रारी विविध स्टेशनांमध्ये आहेत. मोबाईल रेकॉर्ड, बँक बॅलन्स तपासले तर काळेपणा बाहेर येईल अशी जनतेमध्ये जोरदार चर्चा होत आहे.अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असला तरी अटक नाही. रायगड एसपी आँचल दलाल यांच्याकडून पारदर्शक तपास, बँक-मोबाईल तपासणी आणि कठोर कारवाईची अपेक्षा. अन्यथा पोलिस दलाची प्रतिमा धुळीला मिळेल, जनता संतापली

## राजा शिवाजी " चित्रपटाच्या नावात " छत्रपती " शब्द असावा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** "राजा शिवाजी" हा चित्रपट १ मे २०२६ रोजी प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाच्या शीर्षकाबाबत श्री छत्रपती शिवाजी महाराज फाउंडेशनने आक्षेप घेतला आहे. चित्रपटाच्या नावातून "छत्रपती" हा मानाचा किताब वगळणे अजिबात मान्य नाही. यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासाचा, प्रतिष्ठेचा व वारशाचा अवमान होत आहे असे फाउंडेशनचे अध्यक्ष सी. एस. चव्हाण यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

चित्रपटाचे निर्माते रितेश देशमुख व जेनेलिया देशमुख आहेत. त्यांना आम्ही लेखी पत्र दिले आहे. चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराज यांचे सन्मानपूर्वक व ऐतिहासिकदृष्ट्या अचूक




चित्रण करण्यात यावे, जर निर्माते व संबंधित प्राधिकरणांनी तातडीने योग्य ती कार्यवाही करावी. आम्ही कायदेशीर पावले उचलण्याची आम्ही तयारी केली आहे. आवश्यक असल्यास देशभरात आंदोलन व निषेध करण्यात येईल असा इशारा दिला.

या चित्रपटाचे निर्माते म्हणून रितेश व जेनेलिया देशमुख यांनी जबाबदारीने वागून हा विषय तात्काळ मार्गी लावावा असे चव्हाण यांनी सांगितले.

## अहमदपूर–अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर मोठमोठ्या भेगा, कंत्राटदारांचा डांबराने ठिगळं लावण्याचा केविलवाणा प्रयत्न!

**कायमस्वरूपी दुरुस्तीची मागणी :- सामाजिक कार्यकर्ते डॉ .गणेश ढवळे**

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या अहमदपूर–अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी ची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असुन ठिकठिकाणी पडलेल्या भेगा, तडे आणि खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. सुमारे १७० किलो मीटर लांबीच्या आणि ८७८ कोटी रुपये खर्चाच्या या महामार्गावर मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान विशेषतः रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. दुचाकी वाहनांचे चाक खड्ड्यांमध्ये अडकून अपघात होत असल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या संदर्भात तक्रारी करूनही ठोस उपाय योजना न करता संबंधित



कंत्राटदार एचसीपीएल कडून केवळ डांबर टाकून खड्डे बुजवण्याचा तात्पुरता केविलवाणा प्रयत्न केला जात आहे. ही मलमपट्टी तात्पुरती स्वरूपाची दुरुस्ती असल्याने समस्या कायमच राहार आहे. दरम्यान, मांजरसुंभा ते अंबेजोगाई दरम्यान एचपीएम कंपनीकडील कामही रखडलेल्या अवस्थेत आहे. दुभाजक, पथदिवे, दिशादर्शक फलक आणि रस्त्यालगतच्या नाल्यांचे काम अपूर्ण असल्याने स्थानिक नागरिक व दुकानदारांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वारंवार लेखी तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने ठेकेदारांचा बेजबाबदारपणा वाढल्याचा आरोप होत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि जिल्हा प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून रस्त्यांची सिमेंट ब्लॉक कट पद्धतीने कायमस्वरूपी व दर्जेदार दुरुस्ती करावी, तसेच अपूर्ण काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे.

## पळस्पे गावात 'पाणी अडवा, पाणी जिरवा' योजना ठरली घातक; बिल्डरांच्या सांडपाण्यामुळे आरोग्य संकट तीव्र

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पळस्पे गावात जलसंधारणासाठी राबविण्यात आलेली 'पाणी अडवा, पाणी जिरवा' योजना सध्या ग्रामस्थांसाठी मोठे संकट बनली आहे. पाटबंधाऱ्यांमध्ये साचलेले दूषित, दुर्गंधीयुक्त पाणी थेट नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम करत असून, संपूर्ण परिसरात गंभीर आरोग्यधोका निर्माण झाला आहे.

परिसरातील बोरवेल आणि विहिरींचे पाणी पूर्णपणे दूषित झाले असून, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत बिकट झाला आहे. स्थानिक नागरिकांनी थेट आरोप केला आहे की काही बिल्डर्स कोणतीही प्रक्रिया न करता सांडपाणी सरळ नदीपात्रात सोडत आहेत. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हे दूषित पाणी पाटबंधाऱ्यांमध्ये साचत असून, डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात



वाढले आहे. परिणामी, मलेरिया, डेंग्यूसारख्या आजारांचा धोका वाढत आहे.

परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की गणपती विसर्जनासारखे धार्मिक विधीही ग्रामस्थांना याच घाण पाण्यात करावे लागत आहेत. "परंपरा जपायची, पण आरोग्य धोक्यात घालून नाही," अशी संतप्त भावना ग्रामस्थांनी राजीप सदस्य हर्षदा अतुल घरत यांच्या कार्यालयात व्यक्त केली होती.

या समस्येची पाहणी करताना "पाटबंधारे तात्काळ तोडून दूषित पाणी हटवावे आणि सांडपाणी सोडणाऱ्या बिल्डर्सवर कठोर कायदेशीर कारवाई करावी," अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.

यावर प्रतिक्रिया देताना भाजप युवा नेते अतुल घरत यांनी आश्वासन दिले की, "या प्रकरणातील दोषींवर तातडीने कारवाई केली जाईल. प्रशासनाशी समन्वय साधून पाटबंधारे हटवून प्रश्न लवकरात लवकर सोडवण्यात येईल."

मात्र, वारंवार मिळणाऱ्या आश्वासनांनंतरही प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थांचा संयम सुटत आहे. तातडीने उपाययोजना न केल्यास पळस्पे गाव प्रदूषणाच्या विळख्यात आणखी अडकण्याची भीती व्यक्त होत आहे.

# जल जीवन मिशन'ची माहिती देण्यास टाळाटाळ; दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई कधी?

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया /भंडारा जिल्हा प्रतिनिधी :** केंद्र सरकारची अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि कोट्यवधींच्या निधीची तरतूद असलेली जल जीवन मिशन योजना जिल्ह्यात मात्र प्रशासकीय अडेलतट्टूपणामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. या योजनेतील कामांचा हिशोब मागणाऱ्या अर्जदाराला माहिती देण्याऐवजी, जिल्हा परिषद प्रशासनाने त्याची चक्क वणवण सुरू केली आहे. विशेष म्हणजे, अपिलीय अधिकाऱ्यांच्या आदेशालाही जुमानले जात नसल्याने, पाणी पुरवठा विभागात नक्की काय 'पाणी' मुरतंय? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

**प्रशासकीय पारदर्शकतेचा बोजवारा**

लाखनी येथील माहिती अधिकार कार्यकर्ते भावेश धंधुकीया यांनी ६ जानेवारी २०२६ रोजी जल जीवन मिशनच्या कामांबाबत माहिती मागितली होती. यामध्ये




सन २०२१ पासूनची कामे, निविदा प्रक्रिया, कंत्राटदारांची नावे व त्यांना अदा केलेली देयके यांसारख्या महत्त्वाच्या कागदपत्रांचा समावेश होता. मात्र, ३० दिवसांचा कायदेशीर कालावधी उलटूनही जनमाहिती अधिकाऱ्यांनी मौन बाळगले. अखेर अर्जदाराला न्यायासाठी प्रथम अपीलाचा दरवाजा ठोठावावा लागला.

**अपीलात फुटले कर्मचाऱ्यांचे 'बिंग'**

५ मार्च २०२६ रोजी झालेल्या अपील सुनावणीत प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला. संबंधित कर्मचारी सौ. एस. आर. ढवळे (वरिष्ठ सहाय्यक) आणि कु. एम. एस. गोबाडे (कनिष्ठ सहाय्यक) यांनी अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे समोर आले. सुनावणी दरम्यान माहिती तयार असल्याचे सांगितले गेले, मात्र प्रत्यक्षात ती देण्यास टाळाटाळ का केली जात आहे ? हा प्रश्न अनुत्तरितच राहिला. यावरून विभागातील कर्मचाऱ्यांवर वरिष्ठांचा वचक नसल्याचेच सिद्ध होत आहे.

**कार्यकारी अभियंत्यांच्या आदेशालाही वाटाण्याच्या अक्षता**

अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एच. आर. खोब्रागडे यांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखून १० दिवसांच्या आत ऐकून माहिती निःशुल्क पुरवावी असे कडक निर्देश दिले होते. मात्र, या आदेशाला महिना उलटूनही प्रशासन केवळ कागदी घोडे नाचवत आहे. मूळ मुद्द्याला बगल देऊन दिशाभूल करणारी उत्तरे दिली जात असल्याने, ही माहिती लपवण्यामागे भ्रष्टाचारावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न तर नाही ना? अशी शंका आता बळावली आहे.

**संशयाची सुई कंत्राटदारांच्या दिशेने?**

जल जीवन मिशनच्या नावाखाली जिल्ह्यात कोट्यवधींचा निधी खर्च झाला आहे. मात्र, अनेक ठिकाणी कामांचा दर्जा निकृष्ट असल्याच्या तक्रारी आहेत. निविदा प्रक्रियेतील पारदर्शकता आणि कंत्राटदारांना केलेली देयके सार्वजनिक झाल्यास मोठे मासे गळाला लागण्याची भीती प्रशासनाला वाटत असावी, म्हणूनच माहितीचा अधिकार दडपला जात असल्याचा आरोप अर्जदाराने केला आहे.माहिती अधिकार कायद्याची पायमल्ली करणाऱ्या तसेच आदेश धुडकावणाऱ्या कर्मचाऱ्यांवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी काय कारवाई करतात? याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. माहिती दडपणाऱ्या या 'शासकीय भिंती' कधी कोसळणार, हाच खरा प्रश्न आहे.

## धर्माबादजवळ विहिरीत पोहताना विजेचा धक्का;दोन युवकांचा दुर्दैवी मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद (ता. प्र.) : गिरमाजी सूर्यकार :** धर्माबाद शहराजवळील येताळा रोडवरील एका विहिरीमध्ये पोहण्यासाठी उतरलेल्या दोन युवकांचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याची अत्यंत धक्कादायक घटना बुधवारी (दि. 29 एप्रिल 2026) दुपारी सुमारे 1:45 ते 2:15 या वेळेत घडली.

मृतांमध्ये अविनाश भोजन्ना तोंडाकुरवाड (वय 22, रा. रत्नाळी) व कृष्णा नागनाथ माडगिनवार (वय 25, रा. रसिक नगर) यांचा समावेश आहे.

प्राथमिक माहितीनुसार, हे दोघे युवक विहिरीत पोहण्यासाठी उतरले असता पाण्यात विजेचा प्रवाह उतरल्याने त्यांना तीव्र धक्का बसला आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.घटनेची माहिती वाऱ्यासारखी परिसरात पसरताच मोठ्या संख्येने नागरिक घटनास्थळी जमा झाले. माहिती मिळताच पोलीस कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल होत बचावकार्य सुरू केले. संबंधित विहीर अत्यंत मोठी व रुंद असून त्यात अंदाजे 30 फूट पाणी असल्याचे



सांगितले जात आहे.

बचावकार्यादरम्यान काहींनी पाण्यात विजेचा प्रवाह असल्याची शक्यता व्यक्त केल्याने खबरदारी म्हणून त्या परिसरातील वीजपुरवठा तात्काळ बंद करण्यात आला. त्यानंतर शोधमोहीम सुरू करण्यात आली. बराच वेळ शोध घेतल्यानंतर दोन्ही युवकांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.

यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून दोन्ही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय, धर्माबाद येथे पाठवले.या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कळंबोलीतील नागरी समस्यांकडे नगरसेवक रामदास शेवाळे यांनी वेधले महापालिकेचे लक्ष

## पनवेल महानगरपालिका आयुक्तांना दिले निवेदन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** कळंबोली परिसरातील प्रलंबित नागरी समस्यांमुळे स्थानिक रहिवाशांना मोठ्या प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागत आहे. या समस्यांची दखल घेत प्रभाग क्रमांक ८ चे नगरसेवक रामदास शेवाळे यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांची मंगळवार दि. २८ एप्रिल रोजी भेट घेऊन कळंबोलीतील विविध प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. याबाबत पुढील आठ दिवसात सर्वेक्षण करून या सर्व समस्यांचे निराकरण केले जाईल असे आश्वासन आयुक्त मंगेश चितळे यांनी दिले. या बैठकीला स्थायी समिती सभापती बबन मुकादम, तुकाराम सरक हे देखील उपस्थित होते.



नगरसेवक रामदास शेवाळे यांनी आपल्या निवेदनात प्रामुख्याने दोन उद्यानांच्या दुरवस्थेचा मुद्दा मांडला आहे. सेंट जोसेफ स्कूलच्या मागील बाजूस असलेल्या बाबा गार्डनची अवस्था अत्यंत खराब झाली असून, त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच सेक्टर ६ येथील पाण्याच्या टाकीजवळील गार्डन पूर्णपणे जीर्ण अवस्थेत असून ते नागरिकांच्या वापरासाठी अयोग्य झाले आहे. या उद्यानाचे पुनरुज्जीवन करण्याची मागणी रहिवाशांकडून होत आहे. यासह श्री अय्यप्पा मंदिराजवळून मुंब्रा रोडकडे जाण्यासाठी पादचारी रस्ता (फूटपाथ) उपलब्ध नाही. यामुळे पादचाऱ्यांना जीव धोक्यात घालून मुख्य रस्त्यावरून चालावे लागते. नागरिकांची ही गैरसोय दूर करण्यासाठी या ठिकाणी सुसज्ज पदपथ तयार करावा, अशी आग्रही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

कळंबोली परिसरातील अनेक ठिकाणी स्ट्रीट लाईट्स आणि हायमास्ट लाईट्स बंद अवस्थेत आहेत. रात्रीच्या वेळी रस्त्यांवर अंधार असल्यामुळे महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. खराब झालेले दिवे तातडीने बदलून नवीन हायमास्ट लाईट्स बसवावेत, असेही नगरसेवक रामदास शेवाळे यांनी नमूद केले. "कळंबोलीतील या सर्व समस्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित आहेत. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष न करता तातडीने सकारात्मक पावले उचलावीत, अन्यथा नागरिकांच्या हितासाठी आम्हाला अधिक आक्रमक पवित्रा घ्यावा लागेल, असा थेट ईशाराही नगरसेवक रामदास शेवाळे यांनी दिला आहे.

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला खो खो स्पर्धेत एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ संघाचे पहिले उपविजेतेपद

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड :** दिनांक २२ ते २६ एप्रिल दरम्यान मुंबई येथे एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठातर्फे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत संपूर्ण भारतातून अव्वल १६ विद्यापीठांचे संघ सहभागी झाले होते. भारताच्या पश्चिम,उत्तर,पूर्व आणि दक्षिण अश्या चार विभागाच्या स्पर्धेतून पहिले चार संघ हे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरतात. याप्रमाणे याआधी रीवा, मध्य प्रदेश येथे पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला खो खो पश्चिम विभागातील स्पर्धेमध्ये एस.एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई या संघाने या स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच उपविजेतेपद मिळविले आणि अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला स्पर्धेसाठी पात्र ठरला होता.



एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाने या अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेचे यजमानपद भूषविले. या स्पर्धेत यजमान एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ संघाचा समावेश "अ" गटात करण्यात आला होता. या गटात उत्तर विभागाचे विजेतेपद पटकावणाऱ्या संघाबरोबरच गत वर्षीच्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेचा विजेत्या कालिकत विद्यापीठाचा समावेश होता. यजमान संघाने कर्णधार सरीता दिवा हिच्या नेतृत्वाखाली दमदार कामगिरी करून गटातील आपले तीनही सामने हे डावाच्या फरकाने जिंकून रुबाबात बाद फेरीत प्रवेश केला. त्यानंतर उप-उपांत्य फेरीत या संघाने हीच विजयी घोडदौड कायम राखत मंगलोर विद्यापीठ संघाचा १० विरुद्ध ९ असे एक डाव आणि एक गुणांनी दणदणीत पराभव करून उपांत्य फेरीत दिमाखात प्रवेश केला. उपांत्य फेरीच्या सामन्यात यजमान संघाने गत वर्षीच्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेतील उपविजेत्या सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ संघाचा १४ विरुद्ध ८ असा सहा गुणांनी पराभव करून या स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच अंतिम फेरीत प्रवेश केला. या सामन्याच्या मध्यंतराला ७ विरुद्ध ४ अशी तीन गुणांची निर्णायक आघाडी विजेत्या संघाकडे होती. या संघाकडून खेळताना ज्योती मेढे ३ मि, आणि १ मि. ५० सेकंद, दिदी ठाकरे १ मि. ५० सेकंद, आणि १ मि. ४० सेकंद व दोन गडी बाद, कर्णधार सरीता दिवा २ मि. २० सेकंद, आणि २ मि. ३० सेकंद व पाच गडी बाद, विद्या मिरके १ मि. ४० सेकंद , १ मि. ३० सेकंद व चार गडी बाद अशी अष्टपैलू कामगिरी नोंदवत आपल्या संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. अंतिम सामना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ आणि यजमान एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई या दोन संघांमध्ये खेळविला गेला. महिला विद्यापीठ खो खो स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच या दोनही संघानी अंतिम फेरीत प्रवेश केला होता. या सामन्यातही चांगली चुरस दिसून आली. हा चुरशीचा अंतिम सामना मराठवाडा विद्यापीठ संघाने ९ विरुद्ध ७ असा दोन गुण आणि सहा मिनिटे राखून जिंकला. यजमान एस. एन. डी. टी. संघाकडून कर्णधार सरीता दिवा, विद्या मिरके, ज्योती मेढे, दिदी ठाकरे, अर्चना वनमाने यांची चांगली खेळी केली, परंतु त्याना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

पश्चिम विभागातून अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला खो खो स्पर्धेसाठी प्रथमच पात्र ठरलेल्या यजमान एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ संघाने पदार्पणातच अभूतपूर्व कामगिरी करून उपविजेतेपदाला गवसणी घातली. या स्पर्धेत अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या कर्णधार सरीता दिवा, ज्योती मेढे, दिदी ठाकरे, विद्या मिरके, ऋतुजा सहारे यांना गौरी काशिद,सृष्टी बांडे ,अर्चना वनमाने, तेजस्वी पोखरकर, सपना रूपनवर, रितिका चोरगे, सीमा मालुसरे, वैष्णवी परब, रिया कदम आणि वैदेही बहिरा यांनी चांगली साथ दिली. एस. एन. डी. टी. संघाचे सराव शिबीर नाशिकमध्ये जिल्हा क्रीडा संकुलाच्या खो-खो मैदानावर पार पडले होते. या शिबिरामध्ये आम्हाला खूप काही शिकायला मिळाले, चांगला सराव कारण घेण्यात आला. त्यामुळेच आम्हाला पुणे आणि मुंबई विद्यापीठाची मक्तेदारी असलेल्या या खेळामध्ये त्यांना पराभूत करून ही कामगिरी करता आली असे वक्तव्य नाशिकची खेळाडू कर्णधार सरिता दिवा हीने व्यक्त केला.

# पिरकोन येथे नाट्य रसिकांसाठी पर्वनी !!

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** उरण तालुक्यातील पिरकोन गावातील, नाट्य संस्कृती जतन करणारे श्री शिवशंकर नाट्य मंडळ पिरकोन यांच्यावतीने गेले कित्येक वर्ष गावात विविध नाट्य प्रयोग सादर करून नाट्य परंपरेचा वारसा जपला जात आहे.

दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी प्रसिद्ध लेखक श्री.किशोर पाटील लिखित, दिग्दर्शित पोट धरून हसता हसता सामाजिक समस्यांवर विचार करायला लावणारे अस्सल आगरी भाषेतील दोन अंकी विनोदी नाटक गोष्ट धमाल गावाची गुरुवार ३० एप्रिल रोजी रात्री ९ वाजता पिरकोन येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयाच्या भव्य प्रांगणात श्री शिवशंकर नाट्य मंडळाकडून सादर होणार आहे. लेखक किशोर




पाटील यांचे अतिशय गाजलेले हाल्या मारतंय हेलपाटा या नाटकाला महाराष्ट्र राज्य नाट्य मंडळाकडून तीन पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांचे हे नवीन नाटक प्रेक्षकांना नक्कीच आवडेल.

या धम्माल विनोदी नाटकाचा हा शुभारंभाचा प्रयोग विनामूल्य असून समस्त नाट्य रसिकांनी याचा लाभ घ्यावा असे मंडळाने आवाहन केले आहे.

# भंडाऱ्यात व्हॉइस ऑफ मीडियाचा पदग्रहण सोहळा व पत्रकार कार्यशाळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीयाभंडारा जिल्हा प्रतिनिधी :** व्हॉइस ऑफ मीडिया भंडारा जिल्हा यांच्या वतीने जिल्हा व तालुका कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा तसेच पत्रकार कार्यशाळेचे आयोजन बुधवार, दि. २९ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२ वाजता साई प्लाझा हॉटेल, भंडारा येथे उत्साहात पार पडले.

या सोहळ्याला अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्री. निलेश मोरे, व्हॉइस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय समन्वयक तथा संचालक श्री. किशोर करंजेकर, राज्य कार्याध्यक्ष श्री. नरेंद्र देशमुख, वर्धा जिल्हाध्यक्ष निलेश पिंजेकर, भंडारा जिल्हाध्यक्ष शशीकांत भोयर, काशिनाथ ढोमणे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष शशिकांत भोयर यांनी केले तर संचालन व आभारप्रदर्शन रवी भोंगाणे यांनी केले.

**'न्यायासाठी संघटन शक्तीची आवश्यकता' – निलेश पिंजेकर**

वर्धा जिल्हाध्यक्ष निलेश पिंजेकर म्हणाले, "कोरोना काळात अनेक पत्रकारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली. त्याच काळात संदीप काळे सरांनी एका पत्रकार मित्राला मदत करताना विचार केला की, पत्रकारांसाठी संघटना हवी.




बुलढाण्यातील छोट्याशा गावातून व्हॉइस ऑफ मीडियाचा जन्म झाला आणि आज जगातील 73 देशांत ही संघटना कार्यरत आहे. न्यायासाठी संघटन शक्तीची आवश्यकता आहे. पत्रकार निर्भिड असावा."

**'लढाई प्रशासकीय अधिकाऱ्यांशी' – नरेंद्र देशमुख**

राज्य कार्याध्यक्ष नरेंद्र देशमुख म्हणाले, "आपली लढाई प्रशासकीय अधिकाऱ्यांशी आहे. त्यामुळे कार्यक्रमाला अधिकाऱ्यांना निमंत्रित करावे. पत्रकारांनी एकजूट दाखवावी."

**'पत्रकारांसाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन' – किशोर करंजेकर**

राष्ट्रीय समन्वयक किशोर कारंजेकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले, "पत्रकारांच्या विकासासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन झाले आहे. पत्रकारांच्या भविष्यासाठी संघटना सतत कार्यरत राहील." हिवराज उके व अनिल कारेमोरे यांनीही पत्रकारांच्या भविष्याबत मार्गदर्शन केले.

**'निर्भिडपणे चुका मांडा' – अतिरिक्त एसपी निलेश मोरे**

पदग्रहण समारंभात बोलताना अतिरिक्त पोलीस अधीक्षक निलेश मोरे म्हणाले, "2002 पासून पोलीस खात्यात काम करत असताना अनेक जिल्ह्यांतील पत्रकार बांधवांचे फोन येतात. चुकीचे काम निदर्शनास आणून दिल्यास त्यावर कारवाई होते. चांगल्या कामाची दखल घेऊन सत्कारही केला जातो. पत्रकारांनी निर्भिडपणे चुका आमच्यापर्यंत मांडाव्यात. समाजाच्या विकासासाठी प्रशासन व पत्रकारांनी एकत्र काम केले पाहिजे. लोकशाहीची मूल्ये व संविधानिक तत्त्वांचे पालन करताना पत्रकारांचे योगदान महत्त्वाचे आहे." असे संबोधन त्यांनी केले.

सदर वेळी पदग्रहण करण्याकरिता संविधानाच्या ग्रंथाला साक्षी ठेवून पत्रकारांच्या शपथ चे वाचन अतिरिक्त पोलीस अधीक्षक निलेश मोरे यांनी पत्रकारांना शपथ दिली.यावेळी ज्येष्ठ पत्रकार हिवराज उके, अनिल कारेमोरे, मनोज चिचघरे यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमात नवनियुक्त जिल्हा व तालुका कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा पार पडला. बदलत्या काळातील पत्रकारितेची आव्हाने, डिजिटल मीडियाचा प्रभाव व पत्रकारांचे हक्क-जबाबदाऱ्या या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्ह्यातील प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी साकोली तालुका अध्यक्ष आशिष चेगडे, लाखनी तालुका अध्यक्ष कल्याण राऊत, पवनी तालुकाध्यक्ष चरणदास बावणे, तुमसर तालुकाध्यक्ष अनिल कारेमोरे, भंडारा शहर प्रमुख काशिनाथ ढोमणे यांच्यासह जिल्हा कार्यकारणीत विशाल रणदिवे, अनमोल मेश्राम, हंसराज रामटेके, देवचंद टेंबरे, कालिदास खोब्रागडे, अनिल शेंडे, प्रकाश हातेल, डी जी रंगारी, किशोर गडकरी, मनोज चिचघरे यांची सर्वानुमते जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी म्हणून निवड करण्यात आली. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता राकेश श्यामकुवर, अनमोल मेश्राम, हंसराज रामटेके, उमेश जांगडे, सुशील चौधरी, मुकेशकुमार मेश्राम, विलास केजरकर, समीर नवाज आदींनी परिश्रम घेतले.

# नेवासा कृषी कार्यालयाचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर

## काँग्रेसचा कार्यालयास टाळे ठोकण्याचा ईशारा

**दैनिक युवक आधार**

**(नेवासा प्रतिनिधी)-** नेवासा कृषी कार्यालयात वाढलेल्या भ्रष्टाचारा विरोधात आक्रमक भूमिका घेत आज नेवासा काँग्रेस पक्षाकडून तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयास टाळे ठोकण्याचे निवेदन देण्यात आले. नेवासा कृषी कार्यालयात मोठा भ्रष्टाचार माजला असून याबाबत तालुक्यातील शेतकऱ्यामध्ये चर्चा असून शेतकऱ्यामध्ये संताप देखील आहे. यामध्ये कार्यालयातील कर्मचाऱ्याकडून शेती औजारे, कांदा चाळ, ट्रॅक्टर, शेततळे अस्तरीकरण असेल या साठीच्या मंजुरीसाठी कृषी कार्यालयाकडून लागणाऱ्या पूर्वसंमतीसाठी मोठी रक्कम घूस स्वरूपात शेतकऱ्याकडून घेतली जाते, अनेकवेळा उघड फोन पेवर देखील अशा रकमा घेण्यात आल्या आहे. या स्वरूपात मोठा भ्रष्टाचार तालुका कृषी कार्यालयाकडून करण्यात आला आहे. यात कर्मचारी व अधिकारी देखील सहभागी आहेत अधिकाऱ्याच्या वरद हस्ताने हा धंदा चालत आहे असा आरोप काँग्रेस पक्षाकडून व शेतकऱ्यांकडून करण्यात आला आहे.

याशिवाय तालुका कृषी कार्यालयास राज्य सरकारकडून दुरुस्तीसाठी मिळालेल्या लाखो रुपयाच्या निधीतून देखील मोठा अपहार झाल्याची देखील चर्चा आहे. दुरुस्तीच्या नावाखाली बोगस बिले काढून निधीचा अपहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. निधीतुन कोणती कामे केली यांच्या बिलाच्या पावत्यासह विवरण काँग्रेस पक्षांकडून मागविण्यात आले आहे.

**शेतकऱ्यांच्या लाभाच्या विविध योजनाच्या पूर्व संमतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांकडून पैसा उकळणे ही बाब गंभीर असून लवकरच याबाबत कठोर भूमिका घेणार शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेस मैदानात उतरणार. यात सामील भ्रष्ट अधीकाऱ्यांना धडा शिकविल्या शिवाय स्वस्थ बसणार नाही - संभाजी माळवदे, प्रदेश काँग्रेस कमिटी.**

कृषी कार्यालयातील भ्रष्ट कारभारत सामील कर्मचारी व अधिकारी यांची तातडीने चौकशी करून काय कारवाई करणार या संदर्भात लेखी उत्तराची मागणी करण्यात आली आहे.तातडीने चौकशी केली नाही व स्पष्टीकरण दिले नाही तर काँग्रेस पक्षांकडून व शेतकऱ्यांकडून येत्या आठवड्यात तालुका कृषी कार्यलयास टाळे ठोकण्याचे निवेदन तालुका कृषी अधिकारी यांना देण्यात आले आहे.

निवेदनावेळी काँग्रेसचे अध्यक्ष संभाजी माळवदे, शहराध्यक्ष अंजुम पटेल, युवा नेते हरीश चक्रनारायण,उपाध्यक्ष सतीश तऱ्हाळ, संजय वाघमारे, युवा नेते संदीप केंदाळे,कैलास बोर्डे, प्रगतशील शेतकरी राहुल बेंद्रे,संजय होडगर, आदिसह शेतकरी उपस्थित होते.

# पनवेल महानगरपालिकेत सत्ताधारी व विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोप

## विरोधकांचे आरोप ठरवले फोल ; सत्ताधाऱ्यांचा पुराव्यांसह जोरदार प्रतिउत्तर

**लोकनेते रामशेठ ठाकूर ,आ. प्रशांत ठाकूर यांचे लक्ष ; जनतेचा पैसा वाया जाऊ देणार नाही - अँड.बिनेदार**

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वार्ताहर :** पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी गेल्या काही दिवसांत सत्ताधारी पक्ष आणि प्रशासनावर केलेल्या भ्रष्टाचार व नियमबाह्य कामांच्या आरोपांना आज सत्ताधाऱ्यांनी ठोस आणि पुराव्यांसह प्रत्युत्तर दिले. आयोजित पत्रकार परिषदेत म्हात्रे यांचे सर्व आरोप ठामपणे फेटाळण्यात आले असून, हे आरोप केवळ राजकीय प्रसिद्धीसाठी केलेले 'स्टंट' विरोधी पक्ष नेते अरविंद म्हात्रे स्वयंघोषित कायदे पंडित खोटे आरोप करतात आम्ही पालिकेच्या नियमावली प्रमाणे अत्यावश्यक मूलभूत सुविधा देताना पारदर्शक ,दर्जेदार ,अर्थसंकल्प नियोजन विकासकार्य करदात्यांच्या हितासाठी आंतरराष्ट्रीय विमानतळा जवळील आधुनिक शहर घडवताना करत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.



या पत्रकार परिषदेला स्थायी समिती सभापती बबन मुकादम, सभागृह नेते अँड. प्रकाश बिनेदार आणि स्थायी समिती सदस्य अजय बहिरा उपस्थित होते.

विकासाला विरोधकांचा अडथळा तर गरीब,वंचित पिडीत कुष्ट रुग्णांच्या आवास कार्यात हरकती घेण्याचा किळसवाणा उल्लेख सभागृह नेते अँड. प्रकाश बिनेदार यांनी विरोधकांवर टीका करताना सांगितले . कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली "पनवेलमध्ये सुरू असलेल्या कोट्यवधींच्या विकासकामांमुळे विरोधकांची घाबरगुंडी उडाली आहे. प्रत्येक प्रकल्प हा निविदा प्रक्रिया आणि तांत्रिक निकषांनुसार पारदर्शक पद्धतीने राबविल्या जात आहे. मात्र, विरोधी पक्ष नेते अरविंद म्हात्रे जाणीवपूर्वक चुकीची माहिती पसरवून जनतेची दिशाभूल करत आहेत. त्यांच्या आरोपांना कोणताही आधार नाही." त्यांनी उल्लेख केलेल्या सिग्नल शेजारील 200 कोटीचे पुरावे त्यांनी दाखवावे असे आव्हान सभागृह नेते बिनेदार यांनी केले.

स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांनी तांत्रिक बाबी स्पष्ट करत विरोधकांचे दावे फेटाळले. ते म्हणाले, "स्थायी समितीतील प्रत्येक निर्णय हा नियमांच्या चौकटीत आणि लोकहित लक्षात घेऊनच घेतला जातो. विरोधकांनी केलेले आरोप अपुऱ्या माहितीवर आधारित आहेत. काही शंका असल्यास त्यांनी प्रशासनाशी संवाद साधायला हवा होता,नकारात्मकता, दबाव निर्माण करून संभ्रम निर्माण करणे हे केवळ बदनामीचे राजकारण करत आहेत." त्यांनी अपूर्ण अभ्यास व पुराव्याशिवाय केलेले आरोप थांबवावे अन्यथा सूज्ञ जनता त्यांना पुढील काळात आपली जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही असे सांगितले.

यावेळी स्थायी समिती सदस्य अजय बहिरा यांनीही विरोधकांच्या भूमिकेवर सवाल उपस्थित करत म्हणाले की पनवेलच्या विकासाचा वेग रोखण्याचे असे प्रयत्न निष्फळ ठरतील. सत्ताधारी गट पारदर्शकतेने काम करत राहील. पुराव्याशिवाय आरोप केल्यास विरोधकांना कायदेशीर आणि राजकीय उत्तर दिले जाईल, असा ठाम इशारा देण्यात आला.

पनवेलमधील विकासकामांबाबत सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांच्या पार्श्वभूमीवर ही पत्रकार परिषद महत्त्वपूर्ण ठरली असून, सत्ताधाऱ्यांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडत विरोधकांवर पलटवार केला आहे. यावर विरोधी पक्षातील नेत्यांची पुढील काळातील भूमिका काय असेल याकडे पनवेलकरांचे लक्ष लागले आहे.

# निफाडमध्ये जनगणना २०२७ची तयारी वेगात; प्रगणक-पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण, 'स्वगणना'वर भर

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : आगामी जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर निफाड नगरपंचायतीकडून प्रशासनाने तयारीला वेग दिला असून, घर यादी व घरगणनेच्या पूर्वतयारीसाठी नियुक्त प्रगणक आणि पर्यवेक्षकांचे विशेष प्रशिक्षण नुकतेच पार पडले. या प्रशिक्षणामुळे संपूर्ण यंत्रणा आता सज्ज झाली आहे.

नगरपंचायत क्षेत्रासाठी एकूण ६० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यामध्ये ५० प्रगणक (४३ मुख्य व ७ राखीव) आणि १० पर्यवेक्षक (७ मुख्य व ३ राखीव) यांचा समावेश आहे. यंदाच्या जनगणनेत 'स्वगणना' (Self-Enumeration) ही नवीन आणि महत्त्वाची संकल्पना राबविण्यात येणार असून, नागरिकांना स्वतःची माहिती स्वतः भरण्याची सुविधा प्रथमच उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यासंदर्भात प्रशिक्षणादरम्यान प्रगणकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. नगरपंचायतीकडून स्वगणनेसाठी स्वतंत्र मदत कक्षही स्थापन करण्यात येणार असून, नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी विशेष कर्मचारी नेमले जाणार आहेत.

स्वगणना प्रक्रियेनुसार नागरिकांनी जनगणनेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपल्या मोबाईल क्रमांकाद्वारे नोंदणी करायची आहे. नोंदणीनंतर त्यांना 'रेफरन्स आयडी' मिळेल. प्रगणक




घरभेटीदरम्यान नागरिकांनी हा आयडी दाखविल्यास पुन्हा माहिती भरण्याची गरज भासणार नाही. ही स्वगणना प्रक्रिया १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत सुरू राहणार आहे.

त्यानंतर १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणकांकडून घरोघरी जाऊन प्रत्यक्ष घरगणना व संबंधित कामकाज पार पाडले जाणार आहे. या नव्या पद्धतीमुळे नागरिकांचा वेळ वाचण्यासोबतच माहिती अधिक अचूक आणि सुरक्षितपणे नोंदवली जाणार असल्याचा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.प्रशिक्षण वर्गात डिजिटल ॲपचा वापर, डेटा संकलन आणि क्षेत्रीय नियोजन यावर विशेष भर देण्यात आला.

तसेच सर्व कर्मचाऱ्यांकडून गोपनीयता जपण्याची शपथही देण्यात आली. दरम्यान, "स्वगणनेमुळे जनगणनेचे काम अधिक वेगवान आणि डिजिटल होणार असून नागरिकांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा," असे आवाहन चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी धिरज भामरे यांनी केले.प्रशिक्षणास अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. जनगणना अधिनियम १९४८ च्या कलम ११ नुसार विनापरवाना गैरहजर राहणाऱ्यांवर तातडीने प्रशासकीय कारवाई व नोटीस बजावण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# जनतेच्या कराच्या पैशाचा दुरुपयोग थांबवा - सुनील गोवारी

**जनतेच्या पैशाची लूट करणारे निर्णय घेतले आहेत ते रद्द करा - नगरसेविका प्रिया सुनील गोवारी**
**ठेकेदार हटवा, पनवेल महानगर पालिका वाचवा**



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल : वार्ताहर** : पनवेल महानगर पालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत जनतेच्या कराच्या पैशाची लूट करणारे निर्णय घेतले आहेत. ते निर्णय रद्द करून जनतेच्या पैशाची लूट थांबवा अशी आक्रमक भूमिका शिवसेनेच्या नगरसेविका प्रिया सुनील भोईर यांनी घेतली आहे. सत्ताधाऱ्यांचा भ्रष्ट्राचार जनतेसमोर आणणार असे त्यांनी कामोठे येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले

पनवेल महानगर पालिकेत सत्ताधारी संख्याबळाच्या जोरावर कडाडून विरोध करून सुद्धा जनतेच्या पैशाची लूट करणारे ठराव पास करत असल्याचा आरोप त्यांनी केला. पनवेल महानगर पालिकेत बस थांबे बांधले आहेत. ज्यांच्या किंमती 27 लाखच्या घरात आहेत. ज्यामध्ये वन रूम किचन घेऊ शकतो. असा अवाच्या सव्वा रुपये लावून या कराच्या पैशावर डल्ला मारायचा आहे. या बस थांब्याच्या साफ सफाई करण्यासाठी दोन कोटीचा ठराव पास केला आहे. याने जनतेचे पैसे निव्वळ सत्ताधाऱ्यांच्या खिशात जाणार आहे. जे बस थांबे कोट्यवधी रुपये खर्च करून बांधले आहेत. त्या काही बस थांब्यापर्यंत आज पर्यंत बस गेलीच नाही. त्यांची गरज नाही असे बस थांबे उभारून कोणत्या ना कोणत्या मार्गाने यांना लोकांच्या कराचा पैसा हडप करायचा आहे असा गंभीर आरोप उबाठाच्या नगरसेविका प्रिया सुनील भोईर केला आहे.

पालिका हद्दीतील रस्त्याची कामे मिळविण्यासाठी लो किमतीचे टेंडर भरून कामे मिळवत आहेत. त्यानंतर अधिकाऱ्यांच्या संगनमताने त्यात मोठ्या रक्कमेची वाढ केली जात आहे. कामोठे सह अन्य ठिकाणी टॉयलेट बांधले आहेत. त्यांची साफ सफाई होत नाही. परिसरात दुर्गंधी पसरली आहे. त्यात नवीन टॉयलेट बांधून जनतेच्या पैसा यांच्या घशात घालण्याचा यांचा डाव असल्याचे सुनील गोवारी यांनी सांगितले. पालिकेतील बहुतेक कामे ही दोनच कंपन्यांना देण्यात येत आहेत. कामोठे शहरातील पाणी समस्या गंभीर बनली आहे. सत्ताधाऱ्यांकडे कोणतेही नियोजन नसल्याने पनवेलकर पाणी समस्याने त्रस्त आहेत. सत्ताधारी आणि पालिकेच्या दिशाहीन कारभार विरोधात पालिकेवर हंडा मोर्चा काढण्याचा निर्णय शिवसेना उबाठा गटाचे सुनील गोवारी यांनी घेतला आहे. यावेळी शिवसेना शहर प्रमुख रामदास गोवारी, शहर संघटिका संगीता राऊत, समाधान काशीद, प्रभाकर गोवारी, विलास कामोठकर, एकनाथ गोवारी, विजय गोवारी, कमलाकर गायकर, मंगेश इंगोले, नंदा शिंदे, विजय दळवी, स्वप्नील हजारे आदीसह शिवसैनिक उपस्थित होते.




## 'सुपर एल निनो' : २०२६ चा उन्हाळा आणि उष्माघाताचे संकट – वेळीच व्हा सावध!

निसर्गाचे चक्र बदलत असून यंदा उन्हाळ्याने रौद्र रूप धारण करण्यास सुरुवात केली आहे. राज्याच्या अनेक भागांत तापमानाचा पारा चाळीशी पार गेला असून, सूर्याच्या प्रखर किरणांमुळे नागरिकांना त्रास होत आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, २०२६ हे वर्ष भारताच्या हवामान इतिहासातील सर्वात उष्ण वर्ष ठरण्याची शक्यता आहे. या भीषण परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रशासनाने 'हीट वेव्ह'चा (उष्णतेची लाट) इशारा दिला असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

जागतिक हवामान बदलामध्ये 'सुपर एल निनो' ही घटना महत्त्वाची भूमिका बजावत आहे. समुद्र सपाटीचे तापमान वाढल्यामुळे जगभरातील हवामानावर याचे विपरीत परिणाम होतात. यामुळे भारतात मान्सूनवर परिणाम होण्याची आणि उन्हाळ्याची तीव्रता कमालीची वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अनेक राज्यांत तापमान ४५°सेल्सीअस वर जाण्याचे संकेत आहेत.

भारतीय हवामान विभागाच्या (IMD) मानकानुसार किनारी प्रदेशासाठी: सलग दोन दिवस कमाल तापमान ३७°सेल्सीअस पेक्षा जास्त राहिल्यास. जेव्हा तापमान नेहमीच्या सरासरीपेक्षा ४.५°सेल्सीअस ते ६.४°सेल्सीअस ने वाढते, तेव्हा त्याला 'उष्णतेची लाट' म्हणतात. : जेव्हा तापमान सरासरीपेक्षा ६.५°सेल्सीअस पेक्षा जास्त वाढते, तेव्हा अतिउष्ण लाट (Severe Heat Wave) ही स्थिती जीवघेणी ठरू शकते.

**उष्माघाताची लक्षणे: वेळीच ओळखा धोका**

उष्माघात ही केवळ थकव्याची अवस्था नसून ती एक वैद्यकीय आणीबाणी आहे. खालील लक्षणे दिसताच सावध व्हावे:

१. शरीराचे तापमान कमालीचे वाढणे पण घाम न येणे.
२. चक्कर येणे, डोकेदुखी किंवा मळमळणे.
३. त्वचा कोरडी आणि लाल होणे.
४. तीव्र तहान लागणे आणि लघवीचे प्रमाण कमी होणे.
५. लहान मुलांमध्ये प्रचंड चिडचिड आणि सुस्ती येणे.

उष्णतेपासून बचावासाठी 'हे' करा (मार्गदर्शक सूचना)

**जलसंजीवन मंत्र**

तहान लागलेली नसली तरीही दिवसातून किमान ३-४ लिटर पाणी प्या.

निसर्गदत्त पेयांचा वापर करा: लिंबू सरबत, ताक, शहाळ्याचे पाणी, आमसूल सरबत आणि घरगुती पन्हे शरीरातील ओलावा टिकवून ठेवतात.

**पोशाख आणि घराबाहेर पडताना काळजी**

बाहेर पडताना नेहमी सुती, हलके आणि पांढऱ्या किंवा फिकट रंगाचे कपडे घाला.

डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करा. डोळ्यांच्या संरक्षणासाठी गॉगल्स वापरा.

शक्यतो दुपारी १२ ते ३ या वेळेत घराबाहेर पडणे टाळा.

**आहारातील बदल**

प्रथिनयुक्त (High Protein) आहार आणि मांसाहार उन्हाळ्यात कमी करावा, कारण तो पचायला जड असतो.

बाहेरील उघड्यावरचे पदार्थ किंवा शिळे अन्न खाणे टाळा.

अल्कोहोल, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड कोल्ड ड्रिंक्स टाळा, कारण यामुळे शरीरातील पाणी कमी होते.

**घराचे व्यवस्थापन**

दुपारच्या वेळी खिडक्यांना पडदे लावून ठेवा. रात्री हवा खेळती राहण्यासाठी खिडक्या उघड्या ठेवा.

घरातील वृद्धांची आणि लहान मुलांची विशेष काळजी घ्या.

**सामाजिक जबाबदारी**

आपण आपल्यासोबतच मुक्या प्राण्यांचीही काळजी घेणे गरजेचे आहे. घराबाहेर किंवा बाल्कनीत पक्ष्यांसाठी पाण्याचे भांडे ठेवा. पाळीव प्राण्यांना सावलीत बांधा आणि त्यांना पुरेसे पाणी द्या.

**प्रविण डोंगरदिवे**
**उपसंपादक**
**विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग**